सोमवार, ७ मार्च २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २२९
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

अंतरंग

'भाजपचे कार्य वंचित घटकांपर्यंत पोहचवा'/२

खोपोलीतील लॅबोरेटरीज कारखान्यात आग/५

कसोटी : तिसऱ्या दिवशी श्रीलंकेचा खेळ खल्लास/६

## आयपीएलचे वेळापत्रक बीसीसीआयकडून जाहीर



**मुंबई :** बीसीसीआयने रविवारी (दि. ६) इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल२०२२)च्या १५व्या हंगामाचे वेळापत्रक जाहीर केले. वेळापत्रकानुसार, आयपीएल २०२२ चे सर्व लीग सामने मुंबई आणि पुण्यात खेळवले जातील. ६५ दिवसांच्या कालावधीत एकूण ७० लीग सामने आणि ४ प्लेऑफ सामने खेळवले जातील. वानखेडे स्टेडियमवर २६ मार्च रोजी चेन्नई सुपर किंग्ज आणि कोलकाता नाइट रायडर्स यांच्यातील ब्लॉकबस्टर लढतीने आयपीएलच्या १५ व्या हंगामाची सुरुवात होईल. लीगचा पहिला डबल-हेडर २७ मार्च रोजी होणार आहे. ज्याची सुरुवात ब्रेबॉर्नमध्ये दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्याशी होईल आणि दिवसाचा दुसरा सामना पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगलोर यांच्यात डीवाय पाटील स्टेडियमवर खेळला जाईल.

# काँग्रेसच्या काळात प्रकल्प अपूर्ण

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा टोला ▌ पुण्यात मेट्रोचे उद्घाटन



**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यात रविवारी (दि. ६) पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते महापालिकेतील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण, गरवारे ते आनंदनगर मेट्रोचे उद्घाटन आणि इ बस सेवेचे उद्घाटन असे कार्यक्रम झाले. त्यानंतर एमआयटीच्या प्रांगणात मोठ्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मोदींनी काँग्रेसला टोला लगावला आहे. काँग्रेस सरकारच्या काळात भूमिपूजन होत होते. पण तो प्रकल्प कधी पूर्ण होईल हे समजत नसे. वेळेवर प्रकल्प पूर्ण होऊ शकतो, हे मेट्रोने दाखवून दिले असल्याचे सांगून त्यांनी काँग्रेस सरकारवर टीका केली आहे.

आज बारापेक्षा जास्त शहरात मेट्रो काम चालू आहे. त्यात महाराष्ट्र जास्त आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक इकडे मेट्रो सुरू होतेय. लोकांना आग्रह जे मोठे लोक समाजात आपण मानतो त्यांना आग्रह की मेट्रो प्रवास सवय लावा जेवढा जास्त मेट्रो प्रवास तेवढी शहराला मदत होईल. तसेच जास्तीत जास्त ई वाहतूक सुरू झाली पाहिजे असेही पंतप्रधान मोदी यांनी सांगितले आहे.

एमआयटी महाविद्यालय मैदानावर आयोजित विविध विकास प्रकल्पाचे उद्घाटन आणि भूमिपूजन समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाला राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, खासदार प्रकाश जावडेकर, गिरीश बापट, महापौर मुरलीधर मोहोळ, उषा ढोरे आदी उपस्थित होते.

मोदी पुढे म्हणाले, पुणे मेट्रो पुण्यातील वाहतूक व्यवस्थेला मजबूत करेल. जनतेला गर्दी आणि वाहतूकीच्या खोळंब्यापासून मुक्त करेल. पुण्यातील जनतेचे जीवनमान अधिक सुखकर करेल. कोरोना संकटकाळातही मेट्रो प्रकल्पाचा एक टप्पा पूर्ण करण्यात आला आहे. पुणे मेट्रोसाठी सौर ऊर्जेचाही मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे. त्यामुळे दरवर्षी २५ हजार टन कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन कमी होईल. या प्रकल्पासाठी कामगारांनी दिलेले योगदान सामान्य माणसासाठी उपयुक्त ठरेल.

**देशात वेगाने शहरीकरण होत आहे. २०३० पर्यंत शहरी लोकसंख्या ६० कोटीपेक्षा अधिक होईल. शहराची वाढती लोकसंख्या संधी निर्माण करण्यासोबत आव्हानेही निर्माण करते. शहराच्या विस्तारासोबत रस्ते वाहतूकीला मर्यादा येतात. अशावेळी सार्वजनिक वाहतूक सुविधेचा विकास हाच सर्वोत्तम पर्याय आहे. त्यामुळे केंद्र सरकार अशा वाहतूक सुविधांवर आणि विशेषत: मेट्रो प्रकल्पावर विशेष लक्ष देत आहे.**

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

### विविध विकास प्रकल्पांचा शुभारंभ आणि पायाभरणी

पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते बालेवाडी येथे बांधण्यात आलेल्या आरके लक्ष्मण आर्ट गॅलरी, १४० ई-बस आणि बाणेर येथील ई-बस डेपोचेही लोकार्पण आणि मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन आणि मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. मुळा-मुठा नदीच्या ९ किलोमीटरच्या पट्ट्यात नदीचे पुनरुज्जीवन करण्यात येणार आहे. यामध्ये नदीकाठचे संरक्षण, सांडपाणी व्यवस्थापन (इंटरसेप्टर सीवेज नेटवर्क), सार्वजनिक सुविधा, नौकाविहार सुविधा इत्यादी कामांचा समावेश असेल.

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पंतप्रधानांच्या हस्ते अनावरण



छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनाधिष्ठित पुतळ्याचे अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज पुणे महानगरपालिका येथे करण्यात आले. या पुतळ्याची उंची सुमारे ९.५ फूट आहे.

# ढिसाळ नियोजनामुळे 'रायगड भूषण' खिरापत वाटप समारंभात गोंधळ



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेतर्फे देण्यात येणाऱ्या रायगड भूषण पुरस्काराचे रविवारी (दि. ६) गोंधळात वितरण करण्यात आले. यंदा तब्बल २५७ जणांची निवड करण्यात आली होती.

अलिबाग येथील पीएनपी नाट्यगृहात रायगड भूषण पुरस्कार वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ झाला. २५७ जणांना पुरस्काराचे एकाच कार्यक्रमात वितरण करण्यात आले. एकावेळी पाच जणांची नावे पुकारून पुरस्कार वितरण केले जात होते. ढिसाळ नियोजनामुळे कार्यक्रमात गोंधळ उडाला. आपल्या तालुक्यातील पुरस्कार विजेत्यांसोबत नेते व्यासपीठावरच फोटो काढण्यात व्यस्त होते. पुरस्कार विजेत्यांनी कॉरिडॉरमध्ये गर्दी केली होती. अखेर निवेदकांना या सर्वांना समाज द्यावी लागली.

एकाच वेळी एवढ्या मोठ्या संख्येने पुरस्काराचे वितरण होत असल्यामुळे प्रसारमाध्यमांमध्ये टिका झाली होती. त्याची दखल पालकमंत्री आदिती तटकरे यांनी घेतली. रायगड भूषण पुरस्काराचे वितरण प्रत्येक वर्षी करावे. त्यांची संख्या मर्यादित ठेवावी अशा शब्दांत पालकमंत्री आदिती तटकरे यांना आयोजकांना सल्ला द्यावा लागला. रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष योगिता पारधी यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी प्रास्ताविक केले. या वेळी रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष योगिता पारधी, उपाध्यक्ष सुधाकर घरे, माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील, माजी आमदार पंडित पाटील, मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे, अर्थ व बांधकाम सभापती ॲड. नीलिमा पाटील, कृषी सभापती बबन मानवे, महिला व बालकल्याण सभापती गीता जाधव आदी या वेळी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील गुणवंतांचा योग्य सन्मान व्हावा यासाठी रायगड भूषण हा पुरस्कार सुरू करण्यात आला. रायगड भूषण हा जिल्ह्यात प्रतिष्ठेचा समजला जाणारा पुरस्कार आहे. आपआपल्या क्षेत्रात काम करून जिल्ह्याची सामाजिक स्थिती सुधारण्यास हातभार लावला आहे अशा व्यक्तींना रायगड जिल्हा परिषद रायगड भूषण पुरस्कारासाठी निवड करणे अपेक्षित आहे.

## निवडक

### मालेगावात टेम्पोचा अपघात; चार जण ठार

**नाशिक :** मालेगावात टेम्पोचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात चार जण जागीच ठार झाले. तर १५ जण जखमी झाले असून चार जणांची प्रकृती गंभीर आहे. मालेगावच्या चंदनपुरीच्या खंडेराव महाराज यांच्या दर्शनाहून काही नागरिक परतीच्या प्रवासात असताना गिगाव फाट्यावर हा अपघात झाला.

### ऑपरेशन गंगा अंतर्गत १५ हजार भारतीय मायदेशी

**नवी दिल्ली :** ऑपरेशन गंगा अंतर्गत तब्बल १५ हजार भारतीयांना मायदेशी परत आणले आहे. भारत सरकारने दिलेल्या माहितीनुसार ऑपरेशन गंगा अंतर्गत, आतापर्यंत विमानांनी ७६ उड्डाणे घेतली असून, त्या माध्यमातून १५९२० हून अधिक भारतीयांना भारतात परत आणले आहे. या ७६ उड्डाणांपैकी, १३ उड्डाणे गेल्या २४ तासांत झाली असल्याची माहिती दिली आहे.

# खासदार शरद पवार यांच्याकडून लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कौतुक

## पुण्यात श्रीनिवास पाटील व मधुकर भावे यांचा कृतज्ञता सन्मान

**पुणे : प्रतिनिधी**

खासदार श्रीनिवास पाटील आणि ज्येष्ठ संपादक मधुकर भावे यांनी वयाची ८१ वर्षे पूर्ण करून ८२व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभेतर्फे शनिवारी (दि. ५) पुण्यात आयोजित कृतज्ञता सन्मान सोहळ्यात माजी केंद्रीय कृषीमंत्री तथा विद्यमान खासदार शरद पवार यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात खासदार शरद पवार यांनी शैक्षणिक क्षेत्रातील प्रत्येक कार्यात रामशेठ ठाकूर यांची साथ असते, असे म्हणत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याविषयी कौतुकोद्गार काढले. (पान २ वर..)



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

### नेत्र तपासणी शिबिर



**पनवेल : भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नवीन पनवेल येथे आयोजित मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिराचे उद्घाटन रविवारी करण्यात आले. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.** (वृत्त पान ३ वर..)

# 'कुटुंबीयांच्या प्रेमामुळे भारतात सुखरूप आलो'



**रसायनी : प्रतिनिधी**

युद्धभूमी युक्रेनमध्ये हजारो भारतीय विद्यार्थी अडकले आहेत. भारत सरकार या सर्व विद्यार्थ्यांना सुखरूपपणे मायदेशी परत आणण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. रायगड जिल्ह्यातील काही विद्यार्थी युक्रेनमध्ये अजूनही अडकले आहेत, तर काही सुखरुपपणे परतले आहेत. असाच युक्रेन ते भारत या प्रवासातील थरारक अनुभव पनवेल तालुक्यातील लाडीवलीत राहणारा साहील महामणकर याने सांगितला आहे.

मी भारतात २४ फेब्रुवारीला येणाऱ्या विमानाचे तिकीट काढले होते, परंतु किव्हमध्ये परिस्थिती व वेळ खूपच खराब होती. आम्हाला किव्हच्या दूतावासाकडून सूचना देण्यात आली, पण उशिरा झाला होता, कारण तेथे जवळपास साडेतीनशे मुले एकत्र जमलो होतो तेथे खाण्याची आबाळ झाली होती. आम्हाला सर्वांना किव्ह येथे येण्यास सांगितले होते. टॅक्सीवाले पण घाबरत होते. किव्हमध्ये युद्धाची दाहकता वाढली होती. त्यामुळे तेथे आमची बरीच गैरसोय झाली होती. किव्हमध्ये आम्हाला तिरंगा झेंडा मिळाला नसल्याने आम्ही (पान २ वर..)




## महाडमध्येही तीन विद्यार्थी परतले

**महाड : प्रतिनिधी**

महाडमधील खुर्रम बिरादार, शोयब पठाण आणि मुघदा मोरे हे विद्यार्थी युक्रेन येथे अडकल्या होत्या. ११ दिवसांच्या संघर्षानंतर आज हे तीनही विद्यार्थी महाड येथील त्यांच्या कुटुंबात सुखरूप पोहचले. या विद्यार्थ्यांनी त्यांचे युध्दभुमीतील अनुभव व्यक्त करताना मायदेशी आणल्याबद्दल मोदी सरकारचे धन्यवाद मानले. (पान २ वर..)

**युक्रेनमध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांचे खुपच हाल होत आहेत. त्यांना खायला प्यायला अन्नपाणी मिळत नाही. हे अडकलेले सर्व विद्यार्थी जेव्हा मायदेशी त्यांच्या आई वडिलांकडे सुखरूप परत येतील तेव्हाच मला खऱ्या अर्थाने आनंद होईल.**

**-रेहमुनीसा बिरादार, खुर्रमची आई**

## आयसीसी महिला वर्ल्डकप २०२२

# भारताचा पाकिस्तानवर दणदणीत विजय

**माउंट माउंगानुई : वृत्तसंस्था**



आयसीसी महिला वर्ल्डकप २०२२च्या पहिल्याच सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानचा १०७ धावांनी पराभव करून धमाकेदार सुरूवात केली आहे.

भारताने प्रथम फलंदाजी करत पाकिस्तानसमोर विजयासाठी २४५ धावांचे आव्हान दिले होते. मात्र भारतीय गोलंदाजीसमोर पाकिस्तानची डाळ शिजली नाही. गेल्या वर्षी दुबईत झालेल्या टी-२० वर्ल्डकपमध्ये भारतीय संघाचा पाकिस्तानने प्रथमच पराभव केला होता. या पराभवाचा बदला महिला संघाने घेतला. इतक नाही तर महिला संघाने पाकिस्तानविरुद्धच्या विजयाची परंपरा कामय ठेवली. भारताकडून राजेश्वरी गायकवाडने सर्वाधिक ४ विकेट घेतल्या.

भारतीय कर्णधार मिताली राजने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पण पाकिस्तानच्या भेदक गोलंदाजीमुळे भारताची अवस्था ६ बाद ११४ अशी झाली होती. पाकिस्तानने सामन्यावर मजबूत पकड मिळवली असताना भारताच्या स्नेह राणा आणि पुजा वस्त्रकर यांनी शतकी भागिदारी करून आव्हानात्मक धावसंख्या उभी केली. भारताने दिलेल्या २४५ धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवात संथ झाली. त्यांनी १० षटकात फक्त २६ धावा केल्या होत्या. पण त्यांनी एकही विकेट गमावली नव्हती. ११व्या षटकात राजेश्वरी गायकवाडने पाकिस्तानला पहिला धक्का दिला. तिने जवेरिया खानला ११ धावांवर बाद केले. त्यानंतर पाकिस्तानचे फलंदाज खेळपट्टीवर फार वेळ टीकले नाहीत.

भारताने सहावी विकेट ३३व्या षटकात मिताली राजच्या रुपाने गमावली होती. त्यानंतर पाकिस्तानच्या गोलंदाजांना भारताची विकेट मिळवण्यासाठी ५०व्या षटकापर्यंत वाट पाहावी लागली. ५०व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर पुजा बाद झाली. तिने ५९ चेंडूत ८ चौकारांसह ६७ धावा केल्या. तर स्नेहने ४८ चेंडूत नाबाद ५३ धावा केल्या, यात ४ चौकारांचा समावेश होता. अखेरच्या षटकात झुलन गोस्वामीने ३ चेंडूत ६ धावांचे योगदान दिले.

# भाजपचे कार्य वंचित घटकांपर्यंत पोहचवा

**■ आमदार प्रशांत ठाकूर यांचे पदाधिकाऱ्यांना आवाहन**
**■ भटके-विमुक्त आघाडीच्या महिला पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र**

**पनवेल : वार्ताहर**

उत्तर रायगडमधील भटके-विमुक्त आघाडीच्या महिला पदाधिकाऱ्यांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. ६) नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी त्यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना भारतीय जनता पक्षाचे कार्य प्रत्येक वंचित घटकांपर्यंत पोहचविण्याचे आवाहन केले.



या वेळी भाजप भटके-विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, महिला आघाडी प्रदेश सरचिटणीस सुहासिनी केकाणे, उत्तर रायगड भटके-विमुक्त आघाडीच्या महिला जिल्हा संयोजिका विद्या तामखडे, सहसंयोजिका नीता मंजुळे, सहसंयोजिका सुरवंता खताळ, उत्तर रायगड जिल्हा प्रभारी चंद्रकांत मंजुळे तसेच पनवेल शहर मंडळाचे आघाडीचे अध्यक्ष गोपीनाथ मुंडे उपस्थित होते.

सचिन कवितके यांची जिल्हा कार्यकारिणी सदस्यपदी निवड करण्यात आली. तालुका स्तरावरील संयोजिका व सहसंयोजक यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. कामोठे मंडळ संयोजिका म्हणून वैशाली देवडे यांची निवड करण्यात आली. पनवेल मंडळ संयोजिकापदी अस्मिता गोसावी, पनवेल ग्रामीण संयोजकपदी प्रेमला नारनवर व खोपोली संयोजकापदी विभावरी पाठक यांची नियुक्ती करण्यात आली.

या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना आमदार प्रशांत ठाकूर व बबन बारगजे यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व भारतीय जनता पक्षाचे कार्य वंचित घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वांनी काम करावे, अशा सूचना दिल्या. रायगड जिल्हा जिल्हा संयोजिका विद्या तामखडे यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाची मदत केली.



पनवेल : भाजप खारघरच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर कार्निवल २०२२ चे आयोजन स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर व नगरसेवक निलेश बाविस्कर यांनी केले आहे. शनिवारी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या कार्निवलला भेट देत आयोजकांना शुभेच्छा दिल्या. या वेळी स्थायी समिती सभापती ॲड. नरेश ठाकूर, रायगड जिल्हा सरचिटणीस समीर कदम, नगरसेवक प्रवीण पाटील, रामजी बेरा, खारघर शहर मंडळ अध्यक्ष ब्रिजेश पटेल, युवा मोर्चा खारघर तळोजा मंडळ उपाध्यक्ष शुभ पाटील उपस्थित होते.



पनवेल : प्रवीण स्पोर्ट्स वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने खारघर प्रीमिअर लीग २०२२ पार पडली. या स्पर्धेला शनिवारी महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी भेट देत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. या वेळी उपमहापौर सीताताई पाटील, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, नगरसेविका चारुशीला घरत, नगरसेवक रामजी बेरा, प्रवीण पाटील उपस्थित होते.





पनवेल : स्वर्गीय संजय दिनकर भोपी यांच्या प्रथम स्मृतीदिनी रविवारी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. या वेळी नगरसेवक नितीन पाटील व नगरसेवक विकास घरत आदी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## खारघर येथे महिलांसाठी भव्य प्रदर्शन व विक्री मेळावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत जागतिक महिला दिनानिमित्त ५ ते ९ मार्च दरम्यान सेक्टर १२, गावदेवी मैदानावर महिला बचतगट वैयक्तिक महिला उद्योजिकांच्या माध्यमातून विविध वस्तूंचे प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या वेळी पनवेल महानगरपालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, मेळाव्याच्या आयोजिका महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, महिला मोर्चा पनवेल तालुका अध्यक्षा रतक्प्रभा घरत, प्रभाग समिती सभापती वृषाली वाघमारे, प्रमिला पाटील, संजना कदम, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, संतोषी तुपे, रुचिता लोंढे, हेमलता म्हात्रे, पुष्प कुत्तरवाडे, खारघर महिला मोर्चाच्या बीना गोगरी, सोशल मीडिया संयोजिका गीता चौधरी, नगरसेवक शत्रुघन काकडे, समीर कदम, खारघर शहर सरचिटणीस कीर्ती नवघरे, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल उपस्थित होते. या महिला मेळाव्याला जास्तीत जास्त नागरिकांनी भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



## भाजप नगरसेवक राजेश ठाकूर यांचे अभिष्टचिंतन



**उरण : वार्ताहर**

उरण नगरपरिषदेचे भाजपचे नगरसेवक राजेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी (दि. ५) उरणचे आमदार महेश बालदी यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.



या वेळी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप उरण तालुका तथा नगरसेवक अध्यक्ष रवी भोईर, भाजप उरण शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, कामगार नेते सुधीर घरत, भाजप तालुका सरचिटणीस दीपक भोईर, चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत, नगरसेवक अतुल ठाकूर, माजी उपनगराध्यक्ष रमेश ठाकूर, सविन म्हात्रे, रामरतन शमियानाचे राम सहतीया, विशाल पाटेकर, राजेश गावडे, भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

## सक्षम पिढी घडविण्यासाठी निरोगी ज्ञानी बालपण मोहीम

### आदिवासी पाड्यातील मुलांना पोषण पोटलीसह शैक्षणिक किट

**पनवेल : वार्ताहर**

सक्षम भवितव्य घडवायचे असेल तर सक्षम पिढी घडवायला हवी, हे लक्ष समोर ठेवून मानवता फाऊंडेशनने 'निरोगी ज्ञानी बालपण' मोहीम सुरू केली आहे. याचा प्रारंभ शनिवारी (दि. ५) रोजी पनवेल तालुक्यातील चाफेवाडी व फणसवाडी या आदिवासी पाड्यापासून झाला.



मानवता फाऊंडेशनच्या या मोहिमेला पीआयएल मुंबई प्रा. लिमिटेडने पाठबळ दिले. या वेळी पीआयएल मुंबई प्रा. तर्फे तृप्ती कुंदर आणि टीम, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय पवार, कार्याध्यक्ष अभिजीत सांगळे, राष्ट्रीय संयोजिका शितल मोरे आदी उपस्थित होते. या मोहिमेत सहभागी स्नेहा सांगळे, आथांश सांगळे, स्वाती पाटील, सपना शिंदे, अक्षय कोळी, रोशन कोळी, तुषार ढीकुले आणि डॉ. अफजल देवळेकर यांनी सहभाग घेतला होता.

## महिला दिनानिमित्त सोहम फाउंडेशनतर्फे महिलांसाठी हेल्थ किट

**पनवेल : वार्ताहर**

नील्स लेक व्ह्यू सोसायटी, खांदा कॉलनी आणि सोहम फाउंडेशन खांदा कॉलनी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ६) महिला दिनाचे औचित्य साधून सोहम फाउंडेशनतर्फे महिलांसाठी हेल्थ किटचे वाटप करण्यात आले.

नील्स लेक व्ह्यू सोसायटीचे चेअरमन व्यंकटेश अण्णा, सोहम फाउंडेशनच्या अध्यक्षा मंजिरी गणेश मुळे, सचिव ॲड. अश्लेशा मुळे, रुमा घोष, कीर्ती कुलकर्णी, रचना त्रिपाठी, प्रविणा आनंद यांच्यासह सदस्यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पुढाकार घेतला. यावेळी महिलांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रश्नमंजुषा, वक्तृत्व स्पर्धा, नृत्य स्पर्धा या प्रकाराच्या विविध गुणदर्शन कार्यक्रमांचा समावेश करण्यात आला होता. या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




पान १ वरून

## खासदार शरद पवार यांच्याकडून लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कौतुक

खासदार शरद पवार म्हणाले की, तुम्हाला कदाचित माहीत नसेल, पण ते अत्यंत गरीब परिस्थितीत जन्मले होते. नवी मुंबईतील जेएनपीटीच्या सगळ्या परिसरामध्ये जी अनेक कष्टकरी आणि गरीब कुटुंबं होती त्यात रामशेठ जन्मले. अतिशय चिकाटीने आणि कष्टाने पुढे आले. सुदैवाने त्यांना व्यवसायात यश आले. पण त्या यशाचा वाटा आपण समाजाला दिला पाहिजे, हे सूत्र त्यांनी नेहमी पाळले. रयत शिक्षण संस्थेमार्फत एखादा नवीन प्रकल्प हाती घेतला की, त्याला रामशेठ ठाकूरांचा नेहमी पाठिंबा असायचा. शैक्षणिक क्षेत्रातील प्रत्येक कार्यात रामशेठ ठाकूरांची साथ नेहमी असायची. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी त्या काळामध्ये 'कमवा आणि शिका' योजना काढली. कर्मवीरांची हीच शिकवण अंगिकारून रामशेठ ठाकूर आज इथपर्यंत आले आहेत. ते देशाच्या लोकसभेमध्येदेखील होते. आज त्यांचे चिरंजीव विधानसभेत आहेत. ठाकूर अनेक काळापासून सहकार क्षेत्रामध्ये काम करत आहेत. याचा मला आनंद आहे.

ते पुढे म्हणाले की, थेट सिक्कीमच्या राज्यपाल पदापर्यंत मजल मारलेला माझा मित्र श्रीनिवास याच्या माझ्यावर असलेल्या प्रेमात मला यत्किंचीतही फरक आढळून येत नाही. मधुकर भावेंनीदेखील आचार्य अत्रेंवर नितांत श्रद्धा ठेवून पत्रकारिता क्षेत्रात एक शिखर गाठले. आज सत्कार करण्यात आलेल्या या दोन्ही सत्कारार्थींनी त्यांच्या श्रद्धा स्थानावर आणि मैत्रीवर जी अढळ निष्ठा दाखवली, त्यामुळे ते या उंचीपर्यंत येऊ शकले. अशा विविध प्रसंगामधून ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय कृषीमंत्री खासदार शरद पवार यांनी खासदार श्रीनिवास पाटील आणि ज्येष्ठ संपादक मधुकर भावे यांच्या व्यक्तीमत्वांचे अंतरंग उलगडले.

या वेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. डी. वाय.पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, माजी खासदार रामशेठ ठाकूर, माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील, आरोग्य मंत्री राजेश टोपे, राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभेचे कार्याध्यक्ष सचिन ईटकर, उपाध्यक्ष रवींद्र डोमाळे, सुनील महाजन आदी उपस्थित होते.

## 'कुटुंबीयांच्या प्रेमामुळे भारतात सुखरूप आलो'

पेनाने झेंडा रंगवला व रेल्वे स्टेशन येथे आलो. तेथे प्रचंड गर्दी होती, कसेबसे चढलो. अवघड जागेवर बसून आम्ही आमच्या जबाबदारीने प्रवास केला. आम्हाला हंगेरी सरहद्दीवर चांगली वागणूक मिळाली. सतत चौदा तास बसमध्ये बसून राहिलो होतो. हंगेरीमध्ये भारतीय दूतावास होता तेथे थोडी सोयी उपलब्ध होती.

माझे सहा मित्रांसोबत बुडापोस्टमध्ये सहा तास बसून राहिलो व मला शेवटी मुंबई येथे येणाऱ्या विमानात सोय झाली. तिकीट खर्च भारत सरकारने केला. किव्हमध्ये खास सोय झाली नाही. मुंबईमध्ये आलेल्या प्रत्येकाची चांगली सोय व विचारणा केली गेली. आता भारत सरकारने आमचे पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी येथेच सोय करावी, अशी विनंती करतो आहे.

माझी बहीण व कुटुंबातील प्रेम व भारत सरकारने केलेले प्रयत्न व आम्ही धीर सोडला नाही व सकारात्मक दृष्टिकोन सतत ठेवला व सर्वांचे प्रेम यामुळेच सुखरूप परत आलो, पण अजूनही मनाच्या थरकाप होतो आहे.

## महाडमध्येही तीन विद्यार्थी परतले

युक्रेन या देशात एमबीबीएसच्या दुसऱ्या वर्षांत शिक्षण घेणारे महाड तालुक्यातील खुर्रम इजाज बिरादार (वय १९), शोयब पठाण (वय २१) आणि शेवटच्या वर्षाच शिक्षण घेणारी मुघदा पद्माकर मोरे हे तीनही विद्यार्थी आज महाडमधील त्यांच्या कुटुंबात सुखरूप पोहचले. या वेळी आपले अनुभव कथन करताना बिरादार व पठान हे दोघे युक्रेनमधील लव्हीव या शहरात होते. युध्द सुरू झाल्या नंतर या दोघांनी हॉस्टेलमधील रुम सोडून पोलंड गाठले मात्र या ठिकाणी व्यवस्था नझाल्याने ते पुन्हा युक्रेन मध्ये आले व तेथुन २० किमीची पायपीट करून रोमानियात पोहचले. पुढे दुतावासाच्या माध्यमातून त्यांच्या भारता येण्याची व्यवस्था झाली आणि आज अखेर हे विद्यार्थी भारतीय वायुदलच्या विमानाने दिल्ली व तेथुन मुंबईत दाखल झाले, मात्र युक्रेनकडून कोणतेच सहकार्य झाले नसुन उलटी भारतीयांचा युक्रेनकडून ढालीसारखा उपयोग केला जात असल्याचा धक्कादायक खुलासा या विद्यार्थ्यांनी केला आहे. युक्रेनमधुन सुखरुप आपल्याला मायदेशी परत आणल्याबद्दल त्यांनी मोदी सरकारचे धन्यवाद माणले तसेच दिल्ली येथुन मुंबईत आणल्याबद्दल महाराष्ट्र सरकारलादेखील धन्यवाद दिले. आज त्यांच्या आई वडिलांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसत होता.

## शिवमंदिर मैदानाचे स्वखर्चाने केले काँक्रिटीकरण

**नवी मुंबई : बातमीदार**

महाशिवरात्री दिनी नेरुळ सेक्टर २ मधील एलआयजीमधील जयहिंद अपार्टमेंट व श्रद्धा शॉपिंग कॉम्प्लेक्स येथील शिवमंदिरासमोरील परिसरात नवी मुंबई भाजप युवती मोर्चा अध्यक्षा सुहासिनी नायडू यांनी स्वखर्चाने सिमेंट काँक्रिटीकरण करून घेतले. त्यामुळे शिवमंदिरात जाणे नागरिकांना सुसह्य झाले असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

नेरुळ सेक्टर २ येथील एलआयजी सोसायटीत शिवमंदिर आहे. नंतर त्या समोरील भाग ओबडधोबड असल्याने नागरिकांना त्रासास सामोरे जावे लागत होते. सर्वत्र पडलेले डेब्रिज, खड्डे व त्यामुळे उंदरांचा सुळसुळाट या ठिकाणी झाला होता. याबाबत नागरिकांनी सुहासिनी नायडू यांच्याकडे अनेक तक्रारी केल्या होत्या. महाशिवरात्रीनिमित्त या ठिकाणी शिवमंदिरात भाविक गर्दी करीत असतात. ही गरज ओळखत सुहासिनी नायडू यांनी स्वखर्चाने हा भाग स्वच्छ करीत, त्याचे काँक्रिटीकरण करून घेतले. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनी देखील आनंद व्यक्त केला.

जय हिंद अपार्टमेंटमधील सोसायटीचे अध्यक्ष विकास पालकर सेक्रेटरी राजेश जाधव, सचिव गजानन चव्हाण धोंडे, संतोष टेला, रमेश जाधव, मेवेलाल शर्मा, तानाजी कोडग, अनिल शिंदे सुर्वे, नारायण शिंदे, नरेश भोईर, सदस्य सुवर्णा होसमनी, प्रतिभा गुंजाळ, सुषमा कोडग, रुबी नायर, ओमी बन्सीवाल, पार्वती बन्सीवाल, प्रफुल्ल कावळे, भंडारी, अमित कावळे, पवार, गर्गे, रमेश भोईर, शर्मा सुप्रतो दास उपस्थित होते.





**पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत सोमवार, दि. ७ मार्च २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर

**कोव्हॅक्सिन**

- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+)
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+ ते १५+)
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१८+)
- १०. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+ ते १८+)
- ११. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ ते १८+)
- १२. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+ ते १८+)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

# नवीन पनवेल येथे डोळे तपासणी शिबिराला प्रतिसाद

## प्रमुख मान्यवरांची उपस्थिती; लाभार्थ्यांना चष्म्यांचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका प्रभाग समिती 'ड' सभापती ॲड. वृषाली जितेंद्र वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्त नवीन पनवेल येथे मोफत डोळे तपासणी व मोफत चष्मे वाटप शिबिर रविवारी (दि. ६) आयोजित करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यासोबतच या शिबिराला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

नवीन पनवेल सेक्टर १४ येथील के. आ. बांठिया शाळा येथे झालेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आलेल्या नागरिकांची मोफत डोळे तपासणी करून त्यांना मोफत चष्मे वाटपही करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन नवीन पनवेल येथील जय बजरंग मित्रमंडळाचे अध्यक्ष विनोद भगवान वाघमारे, जय बजरंग महिला मंडळ, आई माऊली मित्रमंडळ आणि इतर मित्रपरिवार यांनी केले होते.

कार्यक्रमांना उपस्थित महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, नगरसेवक संतोष शेट्टी, नगरसेविका चारूशिला घरत, राजश्री वावेकर, दर्शना भोईर, माजी नगराध्यक्ष सुनील घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, ज्येष्ठ नेते सी. सी. भगत, प्रभाग क्रमांक १७ वॉर्ड अध्यक्ष विजय म्हात्रे, भाजप नेते ॲड. जितेंद्र वाघमारे, विनोद वाघमारे, पप्पू साळवी, रतन नेमाडे, किशोर वाढवे, जय बजरंग मित्रमंडळाचे अध्यक्ष विनोद वाघमारे, योगेश हांडगे, राजेंद्र घरत, जनार्दन थळी, राजाराम शिंदे, सदाशिव कुमकर, रूपेश सरदार, प्रकाश रिसबूड, प्रशांत पाटील, प्रेम डुकरे, राजेंद्र ठोकळ, राजू गायकवाड, किशोर कारंडे, भालचंद्र वाघमारे, अभिनय म्हात्रे, नीरज चौरसिया, हेमांगी विनोद वाघमारे, मयुरी उनटकट, भारती घरत, प्राजक्ता वाघमारे व आई माऊली मित्रमंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.







## नगरसेवक शत्रुघ्न काकडे यांच्या पाठपुराव्याला यश

### खारघरमधील रस्ता झाला दुरूस्त

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग ५ मधील सेक्टर ७ हिरानंदानी सिग्नल परिसरातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने प्रवाशांना त्रास होत होता. यासाठी नगरसेवक शत्रुघ्न अंबाजी काकडे प्रयत्नशील होते. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून रविवारी त्यांनी सिडको अधिकाऱ्यांना घेऊन हे काम करून घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग ५ मधील सेक्टर ७ हिरानंदानी सिग्नलचा परिसर हा अतिशय रहदारीचा मार्ग म्हणून ओळखला जातो. मात्र हा मुख्य रस्ता पावसाळ्यात खराब झाल्याने वाहतुकीस त्रास होत असे. शिवाय नेहमीच वर्दळीचा मार्ग असल्याने रस्त्याचे डांबरीकरण करण्यास अडथळा येत होता. गेले अनेक दिवस या रस्त्याच्या दुरूस्ती कामासाठी नगरसेवक शत्रुघ्न अंबाजी काकडे प्रयत्नशील होते. त्यासाठी अनेक विनंती अर्ज व प्रत्यक्ष सिडको अधिकाऱ्यांची भेट घेतली होती. अखेर सिडको अधिकाऱ्यांना सोबत घेऊन त्यांनी हे काम करून घेतले. याबद्दल नागरिकांनी व वाहनचालकांनी त्यांचे आभार मानले.



## आयटीआय कॉलेजजवळ टोईंग व्हॅन उलटली

**पनवेल : वार्ताहर**

वाहनांना टोचण करणारी टोईंग व्हॅन आयटीआय कॉलेज पनवेलजवळ उलटली झाल्याची घटना शनिवारी (दि. ५) ६ वाजता घडली. यात चालकाला दुखापत झाली आहे.

टोईंग व्हॅनने दुभाजकाला धडक दिल्याने ती पलटी झाली. याची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. यात चालकाला दुखापत झाली असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



## खाद्यपदार्थ लघुप्रतिकृतीबाबत ऑनलाइन व्याख्यान

**पनेवल :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त, मराठी विज्ञान परिषदेतर्फे 'खाद्यपदार्थ लघुप्रतिकृती' (फूड मिनिएचर) या विषयावर सायली समेळ यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. बुधवारी (दि. ९) दुपारी ४ वाजता हे व्याख्यान ऑनलाइन होणार असून यूट्युबवरून त्याचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. लघुप्रतिकृतीसाठी साधने, प्रक्रिया, त्यातून झालेली उद्योगनिर्मिती आणि आलेले अनुभव इत्यादींचा समावेश या व्याख्यानात असून, कार्यक्रमात शेवटी प्रश्नोत्तरे होतील. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आणि विनामूल्य असून नोंदणीसाठी **https://mavipa.org/events/mahiladin2022/** या लिंकवर भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पनवेल तालुक्यात ९१ कुष्ठरुग्ण झाले बरे

### २०२१ मध्ये १७८ पैकी ६४ रुग्णांवर उपचार सुरू

**पनवेल : वार्ताहर**

कुष्ठरुग्ण इतर रोगांपेक्षा थोडा वेगळा असला, तरी लवकर निदान आणि योग्य उपाययोजना करून रोग बरा करणे शक्य आहे. यासाठी शासन स्तरावर उपाययोजना केल्या जात आहेत. २०२१ मध्ये पनवेल तालुक्यात आरोग्य विभागामार्फत विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत १७८ कुष्ठरुग्ण आढळले असून यातील ९१ रुग्ण बरे झालेले आहेत.

६४ रुग्णावर उपचार सुरु असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी सुनील नखाते यांनी दिली.

२०२० मध्ये तालुक्यात १८७ कुष्ठरुग्ण सापडले होते. त्याचे प्रमाण कमी होऊन २०२१ मध्ये १७८ कुष्ठरुग्ण आढळले आहेत. कुष्ठरोग निर्मूलनाबाबत जनतेमध्ये जनजागृती झाल्यामुळे जनतेचा कुष्ठरोगी व्यक्तीकडे बघण्यचा दृष्टीकोनही बदलत आहे. कुष्ठरोगाचा परिणाम त्वचा, हातातील आणि पायातील परिघवर्ती चेता, नाकाची अंतत्वचा, घसा आणि डोळ्यावर होतो. चेतांच्या टोकावर परिणाम झाल्याने परिणाम झालेल्या भागाची संवेदना नष्ट होते. त्वचेवर बधिर चट्टा आल्यास किंवा हातापायास मुंग्या, बधिरपणा आल्यास किंवा त्वचा लालसर चमकदार दिसू लागल्यास त्वरीत तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करणे आवश्यक आहे. रोगाचे निदान झाले, तरी घाबरण्याचे कारण नसते. यावर प्रभावी औषधे उपलब्ध आहेत. त्यामुळे कुष्ठरोग पूर्णपणे बरा होतो, असेही आरोग्य अधिकारी सुनील नखाते यांनी सांगितले.



**यावर्षी विशेष मोहीम राबविली आहे. १ डिसेंबर २०२१ पासून सुरू झालेली शोधमोहीम मार्च २०२२ अखेरपर्यंत सुरू राहणार आहे. कर्मचारी रुग्णांचा शोध घेत आहेत.**

**–सुनील नखाते, तालुका आरोग्य अधिकारी, पनवेल**

## डॉ. रामचंद्र घरत यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त नवी मुंबईमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष डॉ. रामचंद्र घरत यांचा अभिष्टचिंतन सोहळा तुर्भे येथील मैदानात मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी माजी नगरसेविका विजया घरत यांच्या पुढाकाराने आयोजित भव्य हळदी- कुंकू समारंभात हजारो महिलांनी सहभाग घेऊन मानाचे वाण घेतले. सांस्कृतिक कार्यक्रम, महिलांसाठी विविध खेळ, पैठणी आदी कार्यक्रमात महिलांनी सहभाग घेऊन आनंदोत्सव साजरा केला.

या अभिष्टचिंतन सोहळ्यात आमदार गणेश नाईक, आमदार मंदाताई म्हात्रे, आमदार रमेश पाटील, माजी महापौर सागर नाईक, समाजसेविका प्राची नरेंद्र पाटील, भाजपा महिला जिल्हाध्यक्षा दुर्गा डोक, नवी मुंबई युवती अध्यक्षा सुहासिनी नायडू, नवी मुंबई भाजप महामंत्री कृष्णा पाटील, सतीश निकम, माजी नगरसेविका विजयाताई घरत, माजी नगरसेविका उषा भोईर, प्रभु चव्हाण, राजेंद्र इंगळे, सुरेश अहिवले यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून डॉ. रामचंद्र घरत यांना शुभेच्छा दिल्या.




**माझ्या आजपर्यंतच्या यशस्वी प्रवासात माझी आई आणि पत्नी दोघींना सर्वोच्च स्थान आहे. आईच्या नावे असणाऱ्या विठाई प्रबोधन ट्रस्टच्या माध्यमातून खारघर येथे महिला आणि बालक यांच्यासाठी अत्याधुनिक सुविधांसह भव्य रुग्णालय उभारण्यात येणार आहे. दोघींच्या जन्मदिनी जी माता रुग्णालयात प्रसूत होईल, तिचे संपूर्ण उपचार मोफत करण्यात येईल.**

**– डॉ. रामचंद्र घरत, भाजप अध्यक्ष, नवी मुंबई**

## खारघरमधील बटरफ्लाय गार्डनचे काम रखडले

### काम मार्गी लावण्याची रहिवाशांची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

सिडको महामंडळाने खारघर नोडचा विकास करतांना प्रत्येक सेक्टरमध्ये उद्यान व क्रीडांगणासाठी जागा आरक्षित ठेवलेल्या होत्या. खारघर सेक्टर ३५ एफ येथे बटरफ्लाय गार्डन प्रस्तावित केलेले होते. या कामाची निविदा प्रक्रिया २०१८ साली पूर्ण झाली. मात्र तीन वर्षांनतरही हे काम सुरू न झाल्याने रहिवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे.

सद्यस्थितीत या मोकळ्या भूखंडावर मद्यपींचा व समाज विघातक प्रवृतींचा वावर होत असतो. त्यामुळे या भागातील रहिवाशांच्या सुरक्षेचा प्रश्नही निर्माण झालेला आहे. या अनुषंगाने येथील रहिवासी लवकरात लवकर बटरफ्लाय गार्डन उभारण्याची मागणी करीत आहेत.

विशेष म्हणजे खारघर शहरातील सेक्टर ३५ हे सर्वात मोठे सेक्टर आहे. याठिकाणी एकही नागरिकांच्या करमणुकीच्या दृष्टीने असे गार्डन अथवा उद्यान नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याच्या तक्रारी होत आहे.

## उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कुलगुरूपदी डॉ. विजय माहेश्वरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जैवरसायनशास्त्र (बायोकेमिस्ट्री) विभागातील वरिष्ठ प्राध्यापक तसेच विभाग प्रमुख डॉ. विजय लक्ष्मीनारायण माहेश्वरी यांची कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी शनिवारी (दि. ५) डॉ. माहेश्वरी यांची नियुक्ती जाहीर केली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक प्रदीप पाटील यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे कुलगुरुपद रिक्त झाले होते. कुलगुरू नियुक्तीसाठी राज्यपालांनी जम्मू काश्मिरचे सेवानिवृत्त मुख्य न्यायमूर्ती महेश मित्तल कुमार यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठित केली होती. समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्यानंतर राज्यपालांनी डॉ. माहेश्वरी यांच्या निवडीची घोषणा केली.

## जनजागृतीअभावी महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढले

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय महिलांमध्ये स्तनाचा कर्करोग हा वर्षानुवर्षे सर्वात जास्त प्रमाणात आढळणाऱ्या गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला मागे टाकत आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे महिलांमध्ये कर्करोग शब्दाबद्दल असणारी भीती आणि लक्षणांकडे केलेले दुर्लक्ष ही असल्याचे ज्येष्ठ कर्करोगतज्ज्ञ डॉ. अमित घाणेकर यांनी सांगितले.

स्तनाच्या कर्करोगाची प्रकरणे एवढ्या मोठ्या संख्येने आढळून येत आहेत की, संख्येच्या बाबतीत सर्व घातक रोगांमध्ये तो प्रथम क्रमांकावर आला आहे. मुंबई, तसेच देशातील इतर भागात कर्करोग साक्षरता आणि उपचारांची उपलब्धता कमी आहे. स्तनातील ट्यूमर, इतर घातक रोगांप्रमाणे, उघड्या डोळ्यांना अगम्य असतात. ते वेदनाहीन, कठीण गुठळ्या असलेल्या रूग्णांवर दिसून येतात जे स्पष्टपणे मोठे झाल्यानंतरच ओळखले जातात.



**२०१२ आणि २०१४ दरम्यान, मुंबईतील महिलांमध्ये हा सर्वात सामान्य कर्करोग होता, जो सर्व कर्करोगाच्या प्रकरणांपैकी २८.८ टक्के आहे. नोंदवलेल्या सर्व कर्करोगाच्या प्रकरणांपैकी हे अंदाजे एक तृतीयांश ते चतुर्थांश आहे.**

स्तनाचा कर्करोग होण्याची अनेक कारणे आहेत. आयुष्याच्या संपूर्ण पुनरुत्पादक अवस्थेमध्ये दीर्घकाळापर्यंत इस्ट्रोजेन एक्सपोजर (सुरुवातीला रजोनिवृत्ती, उशीरा रजोनिवृत्ती, उशीरा बाळंतपण किंवा मुले नसल्यामुळे), लठ्ठपणा, वाढलेली स्तन घनता, अनुवांशिक उत्परिवर्तन, कौटुंबिक उत्परिवर्तन आणि आयनीकरण रेडिएशन एक्सपोजर हे काही घटक आहेत. स्तनाच्या कर्करोगावर उपचार करताना 'कर्करोग' या शब्दामुळे समाजात एकप्रकारची भीती निर्माण होते. त्यामुळे अनेक स्त्रिया कर्करोगाच्या तपासणीसाठी जाण्यास संकोच करतात आणि वारंवार त्यांच्याकडे लक्ष देऊ शकतील, अशा संकेतांकडे दुर्लक्ष करतात. यामुळे स्थिती बिघडते, उपचार अधिक कठीण होते. यामुळे स्तनाच्या कर्करोगाने होणाऱ्या मृत्यूंमध्येही वाढ होते. त्यामुळे जागरूकता निर्माण करणे अत्यावश्यक आहे कारण यामुळे केवळ रोगनिदानच नाही, तर जगण्याचे प्रमाणही वाढते, असे ज्येष्ठ कर्करोगतज्ज्ञ डॉ. अमित घाणेकर यांनी सांगितले.

## महिलांसाठी विशेष आधार महानोंदणी अभियान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांच्या वतीने विशेष आधार महानोंदणी अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ४ च्या नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांच्या वतीने ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी आधारकार्डमध्ये पत्ता, नावात बदल, फोटो अपडेट करणे, जन्मतारीख इत्यादी बदल करण्यासंदर्भात विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर शून्य ते पाच वयोगटातील बालकांसाठी नवीन आधारकार्ड काढणे, सुकन्या-समृद्धी योजना अंतर्गत खाते उघडणे, आधार कार्डला मोबाईल नंबर, ई-मेल आयडी लिंक करणे या एक दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, सेक्टर १९ खारघर या ठिकाणी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत करण्यात आलेले आहे. नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी प्रभागातील महिलांना या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केलेले आहे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ११

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. भारताला आपल्या गरजेच्या इतके टक्के इंधनाची आयात करावी लागते?**
**अ.)** १०० टक्के **ब.)** ८५ टक्के **क.)** ६० टक्के **ड.)** ५० टक्के

**२. भारत सरकारने पुनर्गुंतवणूकच्या मार्गाने या आर्थिक वर्षात आतापर्यंत म्हणजे फेब्रुवारीअखेर किती महसूल मिळविला आहे?**
**अ.)** १२,००० कोटी **ब.)** ७८,००० कोटी **क.)** ५०,००० कोटी **ड.)** २४,००० कोटी

**३. केंद्र सरकारने चालू आर्थिक वर्षात (मार्च २०२२ अखेर) एकूण खर्च ३७.७० लाख कोटी रुपये गृहीत धरला होता. जानेवारी २०२१अखेर त्यातील सुमारे किती रक्कम खर्ची पडली असेल?**
**अ.)** ३० लाख कोटी रुपये **ब.)** २० लाख कोटी रुपये
**क.)** २५ लाख कोटी रुपये **ड.)** २८ लाख कोटी रुपये

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka, Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# भारताने करून दाखवले

युक्रेनच्या युद्धग्रस्त भागातून नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी तात्पुरत्या का होईना युद्धविरामाची घोषणा रशियाने केली. निश्चितपणे भारताने सातत्याने यासंदर्भात केलेल्या पाठपुराव्याचे योगदान यामागे आहे. ऑपरेशन गंगा आणखी काही दिवस सुरूच राहील, परंतु अन्य देशांना जे शक्य झाले नाही ते भारताने करून दाखवले आहे. या पंतप्रधान मोदी यांच्या वक्तव्यात तथ्य निश्चितच आहे.

**युक्रेनमधील युद्धग्रस्त शहरांमधून हजारो भारतीय विद्यार्थ्यांना सुखरूप मायदेशी परत आणण्याची मोहीम आणखी काही दिवस सुरूच राहील हे स्पष्ट दिसते आहे. गेले काही दिवस रोजच्या रोज युक्रेनच्या सीमेलगतच्या अनेक विमानतळांवरून भारतीय विमाने या विद्यार्थ्यांना घेऊन भारताकडे उड्डाण करीत आहेत. हे आव्हान सोपे असणार नाही याची पूर्ण जाणीव असल्यानेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरुवातीपासूनच या कामी जातीने लक्ष घातले. ऑपरेशन गंगाचा आराखडा तयार करण्यापासून या मोहिमेच्या अंमलबजावणीतील बारिकसारिक तपशीलांपर्यंत त्यांनी वैयक्तिकरित्या लक्ष घातले. त्यामुळेच राजनैतिक अधिकारी व दूतावासांशी संबंधित यंत्रणेवर हे काम सोपवून स्वस्थ न बसता मोदींनी आपल्या मंत्रिमंडळातील चार मंत्र्यांना युक्रेनकडे रवाना केले व आजही हे चार मंत्री युक्रेनच्या सीमेलगतच्या परिसरात तळ ठोकून आहेत. विद्यार्थ्यांच्या परतीच्या प्रयासांवर बारकाईने लक्ष ठेवण्याबरोबरच विद्यार्थ्यांशी जातीने संपर्क साधून त्यांना मानसिकदृष्ट्या आधार देण्याची जबाबदारीही हे मंत्री पार पाडताना दिसतात. युक्रेनमधील भयावहरित्या चिघळत गेलेल्या परिस्थितीत या विद्यार्थ्यांनी अकल्पित हालअपेष्टांना तोंड दिले आहे. विद्यार्थ्यांकरिता परिस्थिती जितकी बिकट आहे तितकीच त्यांच्या सुटकेकरिता धडपडणाऱ्या भारतीय यंत्रणेसमोरील आव्हानेही बिकटच आहेत. तटस्थपणाची आपली राजनैतिक भूमिका कायम राखत भारताने हे आव्हान बऱ्यापैकी यशस्वीरित्या पेलले आहे. म्हणूनच रविवारी पुण्यात मेट्रो प्रकल्पाच्या लोकार्पण कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान मोदी यांनी इतर देशांना जे जमले नाही ते भारताने करून दाखवले आहे, असे उद्‍गार काढले. एकीकडे काटेकोर नियोजनातून इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची सुटका करून त्यांना मायदेशी परत पाठवण्याचे काम सुरू आहे व त्याचवेळेस या विद्यार्थ्यांशी भावनिकदृष्ट्या जोडले जाण्याची किमयाही साधली जाते आहे. हा पूर्णत: मोदी यांच्या कार्यशैलीचा प्रभाव आहे. विद्यार्थ्यांच्या सुटकेसाठी भारत सरकार हे पराकोटीचे प्रयत्न करत असताना देशातील विरोधक मात्र मोदींना लक्ष्य करण्याचे काम तेवढे करीत आले आहेत. या मोहिमेचे नाव ऑपरेशन गंगा कशासाठी, यातून उत्तर प्रदेशातील निवडणुकीत लाभ मिळवायचा आहे आदी टीका करताना, सरकार किती चोखपणे ही अत्यंत बिकट मोहीम पार पाडते आहे याची दखल घेण्याची गरज मात्र विरोधकांना वाटलेली नाही. युक्रेन आणि रशिया या दोन्ही देशांशी उत्तम संपर्क ठेवून मोदी सरकार हे आव्हान पेलते आहे. त्याचवेळेला संयुक्त राष्ट्रांच्या बैठकांमध्ये आपली तटस्थपणाची भूमिका कायम ठेवण्याची तारेवरची कसरतही सरकारला पार पाडावी लागते आहे. एकाच वेळी अनेक आव्हानांचा सामना करण्याचे हे शिवधनुष्य पेलणे शक्य झाले आहे ते निव्वळ मोदीजींच्या खंबीर नेतृत्वामुळेच. त्यामुळेच विरोधकांचा मोदीजींविषयीचा विखार पुन्हा एकदा उफाळून आला आहे. मोदीविरोध हा एककलमी कार्यक्रम घेऊन विरोधकांनी कितीही आगपाखड केली तरी त्यातून काहीही साध्य होणार नाही. मोदींमुळे काय काय मुमकिन होते आहे याकडे जनतेचे नीट लक्ष आहे.**

# उल्हास नदी संवर्धनाचा प्रयत्न

## खबरबात
संतोष पेरणे

बारमाही वाहणारी नदी प्रदूषणाच्या विळख्यात सापडली की त्यावर अवलंबून असलेल्या सर्वांना त्याचे परिणाम भोगावे लागतात. त्यात केवळ पिण्याचे पाणी प्रदूषित होत नाही तर नद्यांमधील जीव यांचे आयुष्य देखील प्रदूषित पाण्यात असलेल्या सर्वांचे कमी होत जाते, मात्र कर्जतच्या कातळदरा जंगलात उगम पावलेल्या उल्हासनदीचा काही किलोमीटरनंतरचा प्रवास बारमाही नदी मध्ये होतो. ही नदी अनेक महानगरे आणि शहरांना तसेच गावांना पाणी पुरवठा करीत आहे, मात्र गेल्या काही वर्षात ही नदी प्रदूषणाकडे वाहत आहे. त्या जीवन वाहिनी असलेल्या नदीचे प्रदूषण कमी करण्यासाठी अनेक तरुण सरसावले आहेत. गतवर्षी सुरू झालेली उल्हास नदी संवर्धनाची मोहीम यशस्वी करण्यासाठी आता अभ्यास दौरे देखील होऊ लागले आहेत.

उल्हासनदी बचाव कृती समितीमार्फत नुकताच उल्हासनदी अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या एक दोन वर्षांपासून प्रामुख्याने उल्हासनदीच्या संवर्धनासाठी आणि तिचे प्रदूषण रोखण्यासाठी काम करण्यासाठी तरुण एकत्र आले होते. जो विषय गेल्या वर्षभरापासून विविध माध्यमातून लोकांपर्यत पोहचवत होते त्याबाबत सखोल अभ्यास करणे शक्य होणार होते. त्यामुळे एकदंर दोन दिवसीय या अभ्यास दौऱ्यात उल्हासनदीची ढासळत चाललेली प्रकृती, तेथील जलचर आणि जलपर्णी याबाबत सखोल माहिती एकत्रित करण्याचा हा एक छोटासा प्रयत्न सुरू झाला आहे. या अभ्यास दौऱ्यात कल्याण ते कर्जत परिसरातील पर्यावरण रक्षणासाठीची तळमळ असणारे ३०-४० सदस्य सहभागी झाले होते. हे सर्व सदस्य आपल्या परिने उल्हास नदी रक्षणासाठी विविध स्तरावर काम करत आहेत.





उल्हासनदीच्या माथ्यावर कोंढाणा लेणीच्या बाजूला असलेल्या गावापासून साधारण सात किलोमीटर पुढे उल्हासनदीचा उगम ज्या ठिकाणी झाला आहे तो भाग म्हणजे कातळदरा. हे कातळदरा म्हणजे राजमाची गोमुखातून पाण्याचा ओढा आणि लोणावळा-खंडाळा येथील सहयाद्रीच्या पर्वतरांगातून वाहत असलेल्या दोन ओढ्यांचा संगम होऊन पुढे मुळ प्रवाहात नदी पात्र निर्माण झाल्याचे निदर्शनास येते. उमग स्थानात उल्हासनदीचे पाणी स्वच्छ आणि नितळ असल्याचे दिसून आले. तेथे त्यासाठी कोणत्याही प्रक्रियेशिवाय हे पाणी आपण पिऊ शकतो. कातळधारा या भागातून नदी पुढे खळखळत वाहत पुढे घनदाट रानावनातून खळखळत वाहत आहे. या ठिकाणी नदिकिनारी अनेक जलचर, तसेच पक्षी, प्राण्यांच्या विविध आवाजांनी हा परिसर अतिशय सुमधून आणि मनाला शांत करून जातो. नदिपात्रात विविध माशांच्या प्रजाती पहावयास मिळतात,तसेच शिंपळे हे पात्रात दिसून आले तर घनदाट झाडी असल्याने माकडे आदी प्राणी दिसून आले. ही नदी पुढे जसजसी सरकते किंवा तिचा प्रवाह जसा सुरू आहे तस तशी नदिच्या पात्राची धुप झाल्याचे आढळून आले. नदी पात्राला लागून असलेल्या वनस्पती हया आयुर्वेदीक उपचारासाठी मुबलक प्रमाणात उपयुक्त असल्याचे तेथील लोकांकडून सांगण्यात येत असते. उल्हासनदीचे पाणी किती प्रमाणात आणि कोणत्या भागात दुषित झाले आहे हे पाहण्यासाठी या अभ्यास दौऱ्यात सहभागी तरुण यांचा प्रवास दहा किलोमीटर वर पाण्याच्या रंगात, चवीत बदल झाल्याचे अनुभवास मिळत होते. अशा ठिकाणचे नमुने गोळा करण्यात आले आहेत जेणेकरून प्रदुषणाची पातळी किती तीव्र आहे, याचा अभ्यास शास्त्रोक्त पध्दतीने करण्यात येईल.

उल्हासनदीला अनेक ऐतिहासिक, भौगोलिक, प्रादेशिक संदर्भ असून या पाण्यामुळे कित्येक कुटूंबाचे पोट भरत आहे. नदी किनारी अनेक भातशेती, फुलशेती, पालेभाजी करून आपला उदरनिर्वाह करत आहेत. या नदीला असलेल्या ऐतिहासिक वारसा यासाठी आहे. कारण १६५६ साली याच उल्हासनदीवरच छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपले आरमार उभारले असल्याचे इतिहासकार यांचे म्हणणे आहे तसेच नदिकिनारी अनेक ठिकाणी शिवमंदिर, मारूती रायाचे मंदिर असल्याचेही दिसून येते.नदी प्रदुषणास मोठ्या प्रमाणात कारणीभूत असणारे घटक म्हणजे अनेक ठिकाणी किनाऱ्यालगत मोठे रिसॉर्ट, हॉटेल्स, गृहप्रकल्प आणि लोकवस्ती वाढत असल्याने नदीपात्रात सांडपाणी सोडलेले दिसून आले. काही ठिकाणी नदिपात्रालगत डंपिंग ग्राऊडही आढळून आले. उगमस्थानापासून ते रायता (कल्याण) ला ज्या ठिकाणी नदि खाडीत संगम होत आहे. नदीच्या प्रदुषणाबाबत महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने जे दाव्याला येत्या काळात आव्हान समितीमार्फत दिले जाईल. भिवपूरी येथून नेरळ, शेलू, वांगणी, बदलापूर, अंबरनाथ आणि पुढे कल्याण ला समाप्त झाला. येत्या काळात जर या नदी प्रदुषणावर गांभिर्याने लक्ष दिले नाही, तर आपल्या खेडेगावाना पिण्याच्या पाण्याचे महत्वाचे स्त्रोत असलेल्या उल्हासनदीचे गटारगंगेत रूपांतर होऊ नये असे जर वाटत असेल तर वेळीच जागे होणे गरजेचे आहे.

कर्जत शहरात उल्हासनदी प्रदूषण सोबत नेरळ पर्यंत येथील तरुणांनी सुरू केलेली मोहीम ठाणे जिल्ह्यात पोहचली आहे. गेल्या काही वर्षात प्रदुषणामुळे गटारगंगा झालेल्या बालधुनी नदीच्या संवर्धनासाठी अंबरनाथ नगरपालिकेच्या पुढाकाराने सुरू झालेल्या मोहिमेत अंबरनाथमधील विविध शाळा, महाविद्यालयांचे विद्यार्थी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि सगुण रूरल फाऊंडेशनच्या मदतीने या मोहिमेला सुरुवात करण्यात आली. जीआयपी धरणापासून स्वच्छता सुरू केल्यानंतर शिवमंदिराजवळ बंधारा बांधून त्यात जीवाणूंच्या मदतीने पाणी शुद्ध करण्याचा उपक्रमही यावेळी सुरू करण्यात आला. बदलापूर शहरातून उल्हासनगर आणि पुढे वाहणाऱ्या आपल्या उल्हास नदीवरील जलपर्णीला हटवण्यात यश आले आहे. अंबरनाथ तालुक्यातील प्रदूषित वालधुनी नदीच्या संवर्धनाचा प्रकल्प अंबरनाथ नगरपालिकेच्या माध्यमातून हाती घेण्यात आला आहे. अनेक वर्षांपासून या नदीच्या संवर्धनाची मागणी केली जात होती. अखेर अंबरनाथ नगरपालिकेचे ही मोहीम हाती घेण्यात आली असून येत्या जागतिक पर्यावरण दिनापर्यंत ही मोहीम चालवली जाणार आहे. वालधुनी नदीला सहा वेगवेगळ्या भागात विभागून नदीतील स्वच्छतेला सुरुवात करण्यात आली आहे.

रेल्वेच्या अखत्यारित असलेल्या जीआयपी धरणाजवळ स्थानिक ग्रामस्थ, पर्यावरण प्रेमी आणि शाळेचे विद्यार्थी यांचा सहभाग होता. उल्हास नदीची उपनदी असलेल्या वालधुनी नदीचे संवर्धन केले जात आहे. उल्हास नदीवर प्रभावी ठरलेल्या सगुण जलसंवर्धन तंत्राची माहिती सगुणा रूरल फाऊंडेशनचे प्रमुख चंद्रशेखर भडसावळे यांनी दिली आणि अंबरनाथ शहरातील पी. डी. कारखानीस महाविद्यालय, भगिनी मंडळ शाळेचे विद्यार्थी, पालिकेचे सफाई कर्मचारी युवा युनिटी फाऊंडेशन, वालधुनी जल बिरादरी, आरोग्य अधिकारी सुरेश पाटील आणि पर्यावरणप्रेमी प्रदूषण झालेल्या नदीत उतरले. नदीतील कचरा काढून नदीचा प्रवाह सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. जीवाणूंना मदत व्हावी यासाठी वालधुनी नदीवर शिवमंदिराजवळ यावेळी एक मातीचा बंधारा बांधण्यात आला. या बंधाऱ्याजवळ साचणाऱ्या पाण्यात प्राणवायूवर जगणारे जीवाणू सोडले जाणार आहे. त्यांच्या मदतीने पाणी शुद्ध होण्यास मदत होत असते. ही सगुणा जलसंवर्धन तंत्राच्या माध्यमातून उल्हास नदी थेट कर्जत पासून कल्याणच्या खाडीपर्यंत टिटवाळापर्यंत जलपर्णी मुक्त झाली आहे. तेच तंत्र वालाधुनी नदीचे संवर्धन करण्यासाठी राबविले जात आहे.

# कर्जतमधील फार्मसी महाविद्यालयात दीक्षांत समारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च इन्स्टिट्यूट येथे दीक्षांत समारंभ उत्साहात सम्पन्न झाला. या वेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



महाविद्यालयातील सेमिनार हॉल मध्ये दीक्षांत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सरस्वती पूजन आणि जण गण मन या आपल्या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रमुख पाहुणे माजी सहाय्यक आयुक्त डॉ. बलभीम खोमणे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करण्यात आला. या वेळी फार्मा कंपनीजचे इंडस्ट्रियालिट्स, ट्रेनर, आणि कंसल्टंट गोविंद बागनूर, संस्थेचे सदस्य झुलकरनैन डाभिया, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे व प्राचार्य डॉ. मोहन काळे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना 'जीवनाचा इथून पुढील कार्यकाळ हा फार महत्वाचा आहे व त्यासाठी कसून मेहनतीची तयारी हवी असे सुचविले. कठीण परिश्रम व वेळेचे महत्व विद्यार्थ्यांना समजून घ्या असे सांगितले. यावेळी त्यांनी विविध नामवंत व्यक्तींची उदाहरणे दिली. कार्यक्रमाचे डॉ. खोमणे यांनी 'फार्मासिस्ट ओथचा अर्थ, वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन ची हेअल्थ केयर व्याख्या, फार्मासिस्ट लोगो आणि ऍप्रॉन चे महत्व जाणून घ्या व स्वतःचे ब्रॅण्डिंग करा. असा सल्ला दिला. बागणूर यांनी 'जी.सी.पी चे महत्व व आपल्या प्रोफेशन चे महत्व जाणून त्याचा सन्मान करा.' असे सूचित केले. मांडे यांनी विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभावेळी घातल्या जाणाऱ्या पोशाखाचे महत्व समजावून सांगितले विद्यार्थ्यांना भविष्यात राष्ट्र आणि समाजाची सेवा करण्यासाठी त्यांच्या ज्ञान आणि कौशल्यांमध्ये उत्कृष्टता मिळवण्यासाठी प्रेरित केले.

विद्यार्थ्यांना या वेळी मान्यवरांच्या हस्ते सर्टिफिकेट देऊन सन्मानित करण्यात आले. उपस्थितांपैकी काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत मंचावर व्यक्त केले. जुन्या आठवणींना उजाळा देत आपल अनुभव सांगत कनिष्ठ विद्यार्थ्यांना संलग्नित राहण्याचे संबोधन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पूनम पाटील तर आभार प्रदर्शन प्रा. मनीषा चौधरी यांनी केले. या वेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक उपस्थित होते.

# 'दिशा'तर्फे मिस अ‍ॅण्ड मिसेस पोलादपूर स्पर्धा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

कोरोना लॉकडाऊनच्यापूर्वी पोलादपूर शहरातील दिशा सांस्कृतिक ग्रुपतर्फे मुली व महिलांसाठी जागतिक महिला दिनानिमित्त आयोजन करण्यात आले होते. लॉकडाऊन काळात जागतिक महिला दिनानिमित्त कोणतेही कार्यक्रम आयोजित करण्यात आले नव्हते, पण यावर्षी दिशा सांस्कृतिक ग्रुप पुन्हा मिस अ‍ॅण्ड मिसेस पोलादपूर २०२२ ही सौंदर्यवतींसाठी स्पर्धा आणि फनी गेम्सचे आयोजन करून जागतिक महिला दिनाच्या उत्सवासाठी सज्ज झाला आहे.

पोलादपूर शहरातील सुविद्य महिलांनी गेल्या काही वर्षांपासून एकत्र येऊन स्थापन केलेल्या दिशा सांस्कृतिक ग्रुपच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक, सामाजिक, हस्तकला वस्तू विक्रीविषयक, दिवाळीपूर्व वस्तूंची विक्री, रेकॉर्डडान्स, गौरी-गणपतीनिमित्त भोंडला आणि सौंदर्यस्पर्धेचे आयोजन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यापूर्वी २०१६ व २०१७ साली दिशा सांस्कृतिक ग्रुपने मुली व महिलांसाठी जागतिक महिला दिनानिमित्त मिस अ‍ॅण्ड मिसेस पोलादपूर स्पर्धेचे आयोजन केले होते. यंदा गुरुवारी (दि. १०) कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये सायंकाळी ५ वाजता मिस अ‍ॅण्ड मिसेस पोलादपूर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या वेळी फनी गेम्सचे आयोजनही करण्यात आले आहे. स्वत:ची ओळख, वेस्टर्न फेरी आणि प्रश्नमंजुषा अशा तीन फेऱ्यांमध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

इच्छुक महिला स्पर्धकांनी श्रावणी शहा (८०८७५८६३२६), सारिका पालकर (९९६०००८१५७), आदिती नगरकर (८४४६५११५६३), उज्ज्वला शेठ (९८९०२६०२९१), सोनिया शेठ (८१४९७७८२२१) यांच्याकडे अधिक माहितीसाठी संपर्क साधण्याचे आवाहन दिशा सांस्कृतिक ग्रुपतर्फे करण्यात आले आहे.

# सोनेवाडी शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**पाली : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळा सोनेवाडी इयत्ता चौथी मधील विद्यार्थ्यांच्या तीस वर्षानंतरच्या गेट-टुगेदरने आठवणींना उजाळा मिळाला. बालपणीचे अविस्मरणीय क्षण तसेच सुंदर आठवणी बालपणात घेऊन गेलेले क्षण या वेळी अनुभवायास मिळाले. पालीतील दीपा लक्ष्मण काळे व राजेश्री चौधरी यांनी व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपच्या माध्यमातून बालपणीचे १८ मित्र एकत्र आले व त्यांनी धम्माल मस्ती केली.


(छाया : धम्मशील सावंत)

या वेळी लोककल्याणकारी व जनहितार्थ काम करताना अनाथ मुले व वृद्धांना मायेचा आधार देण्याचा संकल्प या ग्रुपने एकदिलाने केला. पुढच्या गेटटूगेदर ला प्रत्येक संकल्पातील कृतिशील कामाची मांडणी देखील करू असे यावेळी ठरविण्यात आले. ३२ वर्षानंतर एकमेकांना पाहतांना ते हास्य डोळ्यातले अश्रू बालपणातले सुंदर जगात घेऊन गेले.

अभ्यासात मागे होते ते नामवंत उद्योजक झाले. तर अभ्यासात हुशार असलेले विद्यार्थी कुणी शिक्षक, कुणी वकील, कुणी डॉक्टर, कुणी इंजिनिअर, कुणी व्यवसायिक, कुणी शेतकरी आणि सरपंच झाल्याचे या वेळी सांगण्यात आले. सर्वांनी मिळून देश व राष्ट्राप्रती सामाजिक बांधिलकी जपताना आपले कर्तव्ये म्हणून आपण समाजातील अनाथ मुले व वृद्धाश्रमातील वृद्ध यांच्यासाठी मायेचा हात व आधार देण्याचा संकल्प या कार्यक्रमात करण्यात आला.

# माणगावात मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

महान तपोनिधी सद्गुरू माऊली श्री बेटकर महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व रायगड भूषण प. पु. गुरुवर्य श्री. दादा महाराज शिंदे व रायगड भूषण प. पु. गुरुवर्य श्री. यशवंत महाराज गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ब्रह्मलीन सद्गुरू माऊली बेटकर महाराज यांची जयंती श्री गोरक्षनाथ मंदिर नवनाथ सत्संग मंडळ ढालघर फाटा याठिकाणी बुधवारी (दि. ९) साजरी करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने या स्थळी सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन नवनाथ सत्संग मंडळ सर्व शाखांचे विश्वस्त आणि सदस्य व शिष्य गळा यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे. आर झुनझुनवाला, शंकर आय हॉस्पिटल नवीन पनवेल, सायन्स क्लब ऑफ ठाणे कोपरी आली श्री गोरक्षनाथ मंदिर नवनाथ सत्संग मंडळ ढालघर फाटा यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शिबिरासाठी सोबत आधार कार्ड, रेशन कार्ड, झेरॉक्स व सध्या चालू असलेली औषधे आणावीत. मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी रुग्णांना त्याच दिवशी ९ मार्चला घेऊन जाण्यात येईल व ११ मार्चला गोरक्षनाथ मंदिर माणगाव येथे सोडण्यात येईल.

अधिक माहिती व नावनोंदणीसाठी अनंत बंधू शिंदे (७३७८९५३५८२), बळीराम भोईर (९९६०५२९९१८), गोरक्षनाथ मंदिर (९२७००४७२९६) यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शिबिरासाठी नवनाथ सत्संग मंडळाचे अध्यक्ष अनंत यशवंत कडू, विश्वस्त कमिटी अध्यक्ष रायगड भूषण शांताराम खाडे, उपाध्यक्ष वामन म्हस्के, सचिव भास्कर म्हस्के, सहसचिव शांताराम शिंदे, खजिनदार अनंत कडू, सदस्य बळीराम भोईर, शिवाजी दसवते, दत्ताराम म्हस्के, नथुराम पालकर, अनंत शिंदे, दत्तात्रय मारणे, महादेव मोरे, शांताराम पवार आदी परिश्रम घेत आहेत.

## आरोग्य प्रहर

# शरीरातील रक्तवाहिन्या निरोगी ठेवणे गरजेचे

मानवी शरीराच्या इतर अवयवांप्रमाणेच रक्तवाहिन्याही निरोगी ठेवणे गरजेचे आहे. निरोगी रक्तवाहिन्या मऊ आणि लवचिक असतात, ज्यामुळे रक्त सहज वाहून पुढे जाऊ शकते. नसांच्या आरोग्याची योग्य काळजी न घेतल्यास त्यांच्यामध्ये घाण साचू शकते, ज्यामुळे त्या कमकुवत आणि अस्वस्थ होण्याचा धोका वाढू शकतो. काहीवेळा नसा घट्ट किंवा कडक झाल्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि हार्ट स्ट्रोकचा धोका वाढू शकतो. नसा आणि रक्तवाहिन्या निरोगी ठेवण्यासाठी आपण प्रथम शारीरिकरित्या सक्रिय असणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे, आपण निरोगी आहार घ्यावा. असे काही पदार्थ आहेत ज्यांचे सेवन करून तुम्ही नसा निरोगी आणि मजबूत बनवू शकता.

**फळे आणि भाज्या-** तुमच्या आहारात वेगवेगळ्या रंगांची फळे आणि भाज्यांचा समावेश करून तुम्ही नसांच्या आरोग्याला प्रोत्साहन देऊ शकता. यामध्ये बायोफ्लेवोनोइड्स फाइटोन्यूट्रिएंट्स आढळतात जे रक्ताभिसरण क्रिया म्हणजेच ब्लड सर्क्युलेशन सुधारतात. पालेभाज्या रक्तपेशी बनवण्यास मदत करतात. त्यामध्ये ओमेगा-३ फॅटी अ‍ॅसिड असते ज्यामुळे नसा मजबूत होतात.

**लाल मिरची आणि हळद-** हजारो वर्षांपासून औषधी उद्देशाने विविध मसाल्यांचा वापर केला जात आहे. हळदीमध्ये अँटी इनफ्लमेट्री गुणधर्म असतात, ज्यामुळे रक्तवाहिन्या कडक होण्यापासून बचाव होतो. लाल मिरची ब्लड सर्क्युलेशन उत्तेजित करते आणि रक्तप्रवाह सुरळीत राखण्यास मदत करते आणि निरोगी परिसंचरणास मदत करते.

**जास्तीत जास्त फायबरयुक्त पदार्थ खा-** फायबरयुक्त पदार्थांचे सेवन केल्याने कोलेस्टेरॉल सुधारण्यास मदत होते. कोलेस्ट्रॉस रक्तवाहिन्या बंद होण्याचे सर्वांत मोठे कारण आहे. आहारात रिफाइंड ऐवजी संपूर्ण धान्य निवडा आणि खारट चिप्स किंवा गोड कँडीजऐवजी स्नॅक्स म्हणून जास्तीत जास्त फळे आणि भाज्या खा.

**मीठ कमी खा-** नसांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी आहारातील सोडियमचे प्रमाण नियंत्रित ठेवणे आवश्यक आहे. प्रक्रिया केलेले किंवा प्री-पॅक केलेले अन्नपदार्थ खाणं टाळा कारण त्यात सोडियमचे प्रमाण जास्त असते. डब्बाबंद किंवा पॅकेज्ड केलेले अन्नपदार्थ खरेदी करताना किंवा खरेदी करण्यापूर्वी त्यातील सोडियमची पातळी तपासण्यासाठी लेबल वाचा. जेवणात वरून किंवा जास्त मीठ टाकू नका.

**हायड्रेटेड राहा-** निरोगी राहण्यासाठी पुरेसे पाणी पिणे आवश्यक आहे. शरीरात सुमारे ९३ टक्के पाणी असते. नसा निरोगी ठेवण्यासाठी तुम्ही दिवसातून किमान आठ ग्लास पाणी प्यावे. यामुळे तुमच्या शरीराला जास्त काळ काम करावे लागणार नाही आणि नसांचे कार्य सुलभ होण्यास मदत होईल.

# खारेपाटमधील भुवनेश्वर मंदिराला पर्यटन स्थळाचा दर्जा



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील खारेपाट येथील भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या पुरातन श्री भुवनेश्वर मंदिराला शासनाच्या पर्यटन विकास विभागातर्फे पर्यटनस्थळाचा दर्जा देण्यात आला आहे. विधान परिषद विरोधी पक्षनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी रायगड जिल्ह्यातील विविध धार्मिक स्थळे व पर्यटनस्थळांचा विकास करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार श्री भुवनेश्वर मंदिराला पर्यटनस्थळाचा दर्जा देण्यात आला आहे.

या पर्यटनस्थळाचा क वर्गाच्या पर्यटनस्थळांमध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे या मंदिर आणि परिसराचा उत्तम विकास होणार आहे. जिल्हा नियोजन समितीने या प्रस्तावाला मान्यता दिलेली आहे. या मान्यतेचे पत्र नुकतचे ग्रामस्थांना सुपूर्द करण्यात आले. श्री क्षेत्र भुवनेश्वर हे तालुक्यातील भक्तांचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे या ठिकाणी सातत्याने पर्यटकांची वर्दळ असते. मात्र येथे पर्यटकांसाठीच्या सुविधांची वानवा आहे. अशीच परिस्थिती जिल्ह्यातील इतर धार्मिक स्थळांचीही आहे. यासाठी विधान परिषद विरोधी पक्षनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा करून भविष्यात हा जिल्ह्यातील पर्यटनस्थळांचा विकस केला जाईल, असे आश्वासन ग्रामस्थांना दिले होते.

खारेपाटातील श्री क्षेत्र भुवनेश्वराला पर्यटन क्षेत्राचा दर्जा मिळून दिल्याबद्दल भुवनेश्वर ट्रस्टचे अध्यक्ष दिपक पाटील व सर्व पदाधिकाऱ्यांतर्फे त्यांचे आभार मानण्यात आले.





# खोपोलीतील अल्टा लॅबोरेटरीजमध्ये आग

## दोन कामगार गंभीर जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या राष्ट्रीय महामार्गावरील औषधांची निर्मिती करणाऱ्या अल्टा लेबोरेटरीज कारखान्यात एका प्लांटमध्ये रविवारी (दि. ६) सकाळी आग लागली. आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले असले, तरी दोन कामगार गंभीर जखमी झाले आहेत. त्यातील एकाला मुंबई येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. आगीचे कारण मात्र स्पष्ट करण्यात आलेले नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी ११ वाजण्याच्या दरम्यान अल्टा लेबोरेटरीज कारखान्यात धुराचे लोट दिसू लागल्यानंतर अपघातग्रस्त मदत टीमचे गुरू साठीलकर व सहकारी कार्यकर्त्यांनी कारखान्यात धाव घेतली. खोपोली अग्निशमन दलाचे प्रमुख हरिदास सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशामनच्या जवानांनी आग विझविण्यास सुरुवात केली होती. पण आगीची तीव्रता पाहता, टाटा स्टील, उत्तम गॅल्वा, मंगलम् तसेच रसायनी येथील अग्निशमन दलास पाचारण करण्यात आले. अखेर दोन तासांनंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. यात दोन कामगार गंभीर जखमी झाले आहेत. त्यातील एका कामगारास उपचारासाठी मुंबई येथे हलविण्यात आल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी, पोलीस उपअधीक्षक संजय शुक्ल, खोपोली पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

आग विझविण्याच्या कामात अपघातग्रस्त मदत टीमचे प्रमुख गुरू साठीलकर, हनीफ कर्जीकर, अमोल कदम, दिनेश ओसवाल, अमोल टकेकर, शाहिद शेख यांचे उपस्थितांनी कौतुक केले आहे.

**▪ या आधीही अपघातांची मालिका**

***अल्टा लॅबोरेटरीज खोपोली औद्योगिक वसाहतीमधील जुना कारखाना आहे. २०१४ मध्येही येथे शॉक लागून दोन कामगार ठार झाले होते. तर कारखान्यात झालेल्या स्फोटात दोन कामगारांना प्राण गमवावे लागले होते.***

## निवडक



### नागोठण्यात पौष्टिक आहार वाटप

**धाटाव :** एकात्मिक बालविकास सेवा अंतर्गत अन्नदातर्फे स्वामीराज फाउंडेशनच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील विविध अंगणवाडीतील कुपोषित बालकांना पौष्टीक आहार वाटप करण्याचे काम सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून बुधवारी (दि. २) नागोठणे विभागातील सर्व अंगणवाडी केंद्रातील कुपोषित मुलांसाठी पाच किलोच्या २६० पोषण पोटलीचे वाटप करण्यात आले. नागोठणे अंगणवाडी केंद्रात झालेल्या या कार्यक्रमाला अन्नदाचे दिपेश, स्वामीराज फाउंडेशनचे अध्यक्ष जयेश माने, कार्यकारी सदस्य उमेश वादल, संजिवनी माने यांच्यासह नागोठणे विभागातील सर्व अंगणवाडीसेविका उपस्थित होत्या. या वेळी उपस्थितांना उत्तम आहार व शिक्षणाचे महत्त्व सांगण्यात आले.

### कुसुमेश्वर मंदिरात महाशिवरात्री उत्सव

**कर्जत** : नेरळ येथील श्री कुसुमेश्वर मंदिरामध्ये महाशिवरात्रीपासून सुरू झालेला उत्सव पुढील तीन दिवस सुरू होता. महाशिवरात्री उत्सवनिमित्त दिव्यांच्या रोषणाईने सजलेला मंदिर परिसर आकर्षण बनले होते. शिवरात्रीचे दिवशी विश्वस्त अरूण धारप यांच्या हस्ते महाअभिषेक झाल्यावर भाविकांची दर्शनासाठी रिघ लागली होती. प्रथेप्रमाणे प्रतिपदेला रात्री पालखी काढण्यात आली. पालखी सोहळ्यात धारप परिवारातील आप्तेष्ठांसह सर्वश्री बाळ पिंपुटकर, भूमकर, मिलींद साने, अमित जोगळेकर, दिलीप कवाडकर, विनायक रानडे, अमेय जोशी, अक्षय जोशी, नंदा सावंत, संदीप मोडक, कैलास दहिवलीकर, पाटणटर, दत्ता मिसाळ, शांताराम साळुंके, ओंकार लेले उपस्थित होते.



# कोंडिवली येथील पुलाचे अर्धवट बांधकाम

## ▪ जुन्या पुलालाच नवीन साज देण्याचा प्रकार? नागरिकांचा सवाल



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन-दिवेआगर मार्गावरील कोंडिवली गावाजवळ जुनाट पुलाचे अर्धवट बांधकाम ठेवले असल्याचा आरोप नागरिकांमधून केला जात आहे. जुन्या पुलाचे जीर्ण झालेले आतील भाग तसेच ठेऊन त्यावर जॅकेटवॉल बांधून जुन्या पुलाला नवीन दाखवण्याचा प्रयत्न तर केला जात नाही ना? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

डोंगर व शेतीमधील पावसाचे पाणी जाण्यासाठी बांधण्यात आलेला पूल जीर्ण झाल्याने या पुलाची नव्याने बांधणी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याकडून ४० ते ४२ लाख रुपयांचा ठेका काढण्यात आला आहे. सध्या जुन्या पुलावर जॅकेटवॉल बांधण्याचे काम सुरू आहे. बांधकामासाठी रेती उपलब्ध नसल्यामुळे शासकीय कामासाठी क्रशहँड खडी वापरण्यास शासनाने परवानगी दिली आहे. मात्र याठिकाणी सर्रास गिरीटचा वापर केला जात असल्याचा आरोप परिसरातील नागरिक करीत आहेत.

सतत रहदारी असलेल्या मार्गावरील हा निकृष्ट दर्जाचा पूल भविष्यात धोकादायक ठरू शकतो, अशी भीती नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

याबाबत ठेकेदार कंपनी भगवान इन्फ्रास्ट्रक्चरच्या सानप यांना विचारणा केली असता, पुलाचे काम शासकीय नियमांनुसार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

> **४० ते ४२ लाखांचा ठेका असून अशा पद्धतीचे जॅकेटवॉल बांधण्याबाबत निविदेत नमूद आहे. त्याप्रमाणे काम सुरू आहे.**
> **-जेठे, अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग**

# श्रीवर्धन येथे आजपासून पर्यटक मार्गदर्शक प्रशिक्षण कार्यक्रम

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पर्यटन क्षेत्रामध्ये तरुणांना रोजगार संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने पर्यटन संचालनालयाच्या प्रादेशिक कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्यावतीने ७ ते ११ मार्च या कालावधीमध्ये श्रीवर्धन येथे पर्यटन मार्गदर्शन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामुळे विविध स्थानिक युवकांना पर्यटनाविषयक रोजगाराची माहिती मिळून व्यवसाय करण्याची संधी मिळणार आहे.

पर्यटन मार्गदर्शन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत (आयआयटीटीएम) तसेच पर्यटन संचालनालयातील तज्ज्ञ व्यक्ती मार्गदर्शन करणार आहेत. या प्रशिक्षणासाठी स्थानिक तरुणांना प्राधान्य देण्यात आले आहे. यासाठी ३० प्रशिक्षणार्थींनी नोंदणी केली आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षणार्थींना पर्यटन संचालनालयातर्फे प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येईल त्याचप्रमाणे त्यांना ओळखपत्रही देण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींना पर्यटन संचालनालयाकडून सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण आणि संध्याकाळचा चहा तसेच कॅप आणि मास्कसुध्दा नि:शुल्क देण्यात येणार आहे, अशी माहिती उपसंचालक (पर्यटन) कोकण विभाग, नवी मुंबई हनुमंत हेडे यांनी दिली आहे.

# अलिबाग येथे वैकल्पिक वाद निवारण केंद्राच्या नूतन इमारतीचे उद्घाटन




**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग वैकल्पिक वाद निवारण केंद्राच्या नूतन इमारतीचा उद्घाटन रविवारी (दि. ६) रोजी न्याय सेवा सदन, जिल्हा व सत्र न्यायालय येथे पार पडले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला वैकल्पिक वाद निवारण केंद्राच्या नूतन इमारतीच्या कोनशिला अनावरण करून फीत कापून करण्यात आले.

या वेळी प्रमुख अतिथी म्हणून उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती दिपांकर दत्ता, न्यायमूर्ती उच्च न्यायालय, मुंबई तथा कार्यकारी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई ए. ए. सय्यद, न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई तथा पालक न्यायमूर्ती अलिबाग गिरीश कुलकर्णी, उच्च न्यायालयाचे महाप्रबंधक महेंद्र चांदवाणी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विभा इंगळे, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, जिल्ह्यातील सर्व न्यायाधीश, अलिबाग बार काऊन्सिलचे अध्यक्ष ॲड. प्रविण ठाकूर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संदीप स्वामी आदी मान्यवर हे उपस्थित होते.

# सुरेश अलकुंटे यांचे कार्य सामाजिक भावनेतून-संगीता माने



**पेण : प्रतिनिधी**

शिक्षादानाचे कार्य करताना असतानासुद्धा एक सामाजिक भावनेतून कार्य करण्याचे काम सुरेश अलकुंटे यांनी केले असल्याचे गौरवोद्गार पेण न. प. शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी संगीता माने यांनी काढले. पेण नगर परिषद शाळा क्र. ८ चे मुख्याध्यापक सुरेश अलकुंटे यांचा निरोप समारंभ उर्दू शाळा येथे पार पडला, यावेळी त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून पेण नगर परिषदेचे मुख्यधिकारी जीवन पाटील, प्रशासनाधिकारी संगीत माने, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या महिला आघाडी प्रमुख जयश्री म्हात्रे, सरचिटणीस मदन कोळी आदींसह इतर मान्यवर उपस्थित होते.

या वेळी अलकुंटे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, आपल्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या पालकांसोबत सलोख्याचे नाते निर्माण केले पाहिजे. मी जरी सेवानिवृत्त झालो असलो तरी आपल्याला ज्या वेळी माझी मदत लागेल, त्या वेळी तत्काळ आपण हजर राहणार असल्याचे सांगितले.

उपस्थित शिक्षकांनीसुद्धा आपल्या मनोगतातून अलकुंटे यांच्याबद्दल भावना व्यक्त केल्या. सुरेश अलकुंटे यांना शाल, श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक दशरथ एरणकर यांनी केले.

# आदिवासी विद्यार्थिनींना गुड टच बॅड टचचे धडे

## चाइल्ड हेल्प फाउंडेशनचे शैक्षणिक शिबिर




**कर्जत : बातमीदार**

हेल्प फाउंडेशन सामाजिक संस्थेने मोतीलाल ओसवाल फाउंडेशन यांच्या सहकार्याने जिल्ह्यातील वांगणी स्थित शासकीय आश्रमशाळेत शैक्षणिक उन्हाळी शिबिराचा समारोप करण्यात आला. दरम्यान चाइल्ड हेल्प फाउंडेशनच्या प्रमुख मीना लोखंडे यांनी विद्यार्थ्यांना लैंगिक छळाविरोधात बोलण्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी पॉश आणि पोक्सो ही सत्रे आयोजित केली. विद्यार्थ्यांना वाईट आणि चांगल्या स्पर्शाची (बॅड टच गुड टच) जाणीव करून देण्यात आली. वांगणीमधील आठवी ते दहावीपर्यंतच्या १५९ विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला.

आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो आणि शिक्षणाचा अभाव असतो. विद्यार्थ्यांमध्ये सर्वांगिण विकास घडवून आणणे ही या शिक्षण शिबिरामागील मुख्य कल्पना आहे. आम्ही केवळ त्यांच्या शैक्षणिक विकासावर लक्ष केंद्रित केले नाही, तर योगासारख्या अनेक शारीरिक व्यायामाचे आयोजन केले. या शैक्षणिक शिबिराद्वारे स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान, इंग्रजी यांसारखे शैक्षणिक विषय शिकण्यास तसेच योग आणि क्रीडा सत्रांद्वारे शारीरिक प्रशिक्षण दिले.

डॉ. जयश्री पारेख, पीएचडी. रसायनशास्त्रात, विज्ञान विषयावर सत्र आयोजित केले आणि करिअर समुपदेशन सत्राद्वारे विद्यार्थ्यांच्या त्यांच्या भविष्यासंबंधीच्या शंकांचे निरसन केले.

**टीप आणि युक्त्या**

***उन्हाळी शिबिराच्या उपक्रमांसोबत डॉ. प्रभा रस्तोगी यांनी, बोर्ड परीक्षेत चांगले गुण मिळवण्यासाठी व विद्यार्थ्यांना गणिताचा आनंद घेण्यासाठी टिप आणि युक्त्या शिकवल्या. संस्थेच्या अंजली पटेल यांनी विद्यार्थ्यांना व्याकरण आणि शब्दसंग्रहाचे धडे दिले. कॅन्सरचे सामान्य प्रकार, त्याचे निदान कसे केले जाते आणि उपचार प्रक्रियेकडे कसे जायचे, याबद्दल मुलांना सांगण्यात आले.***

## शेतकरी संस्थेच्या सल्लागारपदी ॲड. आकाश म्हात्रे

**पेण** : शेतकरी संस्थेची कार्यकारिणीची सभा नुकतीच पार पडली. या वेळी संस्थेच्या अध्यक्षपदी अरुण पाटील यांनी सल्लागारपदी ॲड. आकाश म्हात्रे, सचिवपदी नरेंद्र पाटील, कोषाध्यक्ष अरुण म्हात्रे, उपाध्यक्षपदी अभिमन्यू पाटील यांची निवड घोषित केली. डॉ. सुभाष घरत यांनी अनुमोदन दिले. अरुण पाटील म्हणाले शेतकऱ्यांनी संघटित व्हावे, शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याची शक्ती संघटनेत आहे, असे सांगितले.

**शॉप विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत ६१५ बिल्टअप एरिया असलेले शॉप विक्री करणे आहे.

-: संपर्क :-
9321592113
8104477440

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No. : EE/EHV (O&M )/ DIVN/MHD/Tech/ Tender-01/2022-23 Dtd. 07.03.2022 RFX No. 7000022432** | **Sub :-** Invitation of SRM E-Tender for providing Housekeeping Services in the premises of EHV (O&M) Dn. Office Mahad, Staff quarters colony & KTL Sub Division office premises, 220KV Mahad SS control room & Staff quarters colony, 220 KV Kandalgaon SS control room , Staff quarters colony & Substation Maintenance sub Division, 220 KV Vile Bhagad S/s, 100 KV Roha SS control room & Staff quarters colony, 100 KV Mhasla SS control room & Staff quarters colony including colony under EHV (O&M) Division, Mahad for the year 2022-23. | **Rs. up to 978941.23/- (Including GST + 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST+1% Labour CESS.
Bid submission is from 07.03.2022 @ 00:00 hrs to 13.03.2022 @23:59Hrs for above tender
for further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089
**Note:** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Sanjay O. Katkar)**
**Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad**

# तिसऱ्या दिवशी श्रीलंकेचा खेळ खल्लास

## मोहाली कसोटीत भारताचा २२२ धावांनी विजय





**मोहाली : वृत्तसंस्था**

रविंद्र जडेजाच्या ऑलराउंड कामगिरीच्या जोरावर भारताने मोहाली येथे झालेल्या पहिल्या कसोटीत श्रीलंकेवर एक डाव आणि २२२ धावांनी मोठा विजय मिळवला. या विजयासह टीम इंडियाने २ सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील पहिल्याच कसोटीत टीम इंडियाने विजय मिळवाल तर १००वी कसोटी खेळणाऱ्या माजी कर्णधार विराट कोहली याला विजयाची खास भेट देखील दिली.

पहिल्या कसोटीच्या तिसऱ्या दिवशी श्रीलंकेचा पहिला डाव फक्त १७४ धावांवर संपुष्टात आला. भारताकडून रविंद्र जडेजाने सर्वाधिक ५, आर अश्विन आणि जसप्रीत बुमराह यांनी प्रत्येकी दोन तर मोहम्मद शमीने १ विकेट घेतली. भारताकडे पहिल्या डावात ४०० धावांची आघाडी होती. त्यामुळे श्रीलंकेला फॉलोऑन देण्यात आला. पण दुसऱ्या डावात देखील श्रीलंकेला भारतीय गोलंदाजांचा सामना करता आला नाही. आर अश्विनने तिसऱ्या षटकात लंकेला पहिला धक्का दिला आणि त्यानंतर एका पाठोपाठ एक विकेट पडत गेली. दुसऱ्या डावात विकेटकीपर निरोशन डिक्वेल्ला वगळता लंकेच्या एकाही फलंदाजाला खेळपट्टीवर अधिक वेळ थांबता आले नाही. डिक्वेल्लाने नाबाद ५१ धावा केल्या.

कर्णधार रोहित शर्माने या सामन्यात टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. भारताकडून पहिल्या डावात रविंद्र जडेजाने नाबाद १७५ धावा केल्या. तर विकेटकीपर ऋषभ पंत ९६, आर अश्विनने ६१ तर हनुमा विहारीने ५८ धावांची अर्धशतकी खेळी केली. १००वी कसोटी खेळणाऱ्या विराट कोहलीला ४५ धावा करता आल्या. भारतावर दुसऱ्या डावात फलंदाजी करण्याची वेळ आली नाही त्यामुळे १००व्या कसोटीत शतक करण्याची विराटची संधी हुकली.

या सामन्यातील दुसऱ्या डावात भारताचा फिरकीपटू आर.अश्विनने श्रीलंकेच्या चरित असलंकाला बाद केले आणि कसोटी करिअरमधील ४३५वी विकेट घेतली. भारताकडून कसोटी सर्वाधिक विकेट घेणारा तो दुसऱ्या क्रमांकाचा गोलंदाज ठरला आहे. त्याने माजी कर्णधार कपिल देव यांचा ४३४ विकेटचा विक्रम मागे टाकला. दुसऱ्या डावात भारताकडून जडेजा आणि आर अश्विनने प्रत्येकी ४ तर शमीने २ विकेट घेतल्या. सामन्यात जडेजाने ९, तर अश्विनने ६ गडी बाद केले.



**पनवेल : महानगरपालिका क्षेत्रातील छत्रपती संभाजी महाराज मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या महापौर चषकला शनिवारी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. या वेळी आयोजकांनी त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.**



**खारघर : प्रवीण स्पोर्ट्स वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने खारघर प्रीमिअर लीगचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण रविवारी पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांनी आयोजक व खेळाडूंचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. नगरसेवक प्रवीण पाटील, रामजी बेरा, खारघर शहर मंडळ अध्यक्ष ब्रिजेश पटेल, युवा मोर्चा खारघर तळोजा मंडळ उपाध्यक्ष शुभ पाटील, विशाल नाईक आदी उपस्थित होते.**

## 'एमसीजी'मधील स्टॅण्डला शेन वॉर्नचे नाव देणार

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

फिरकीचा जादूगार आणि ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू शेन वॉर्नच्या आकस्मिक निधनामुळे क्रिकेटवर्तुळ व विशेषत: ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का बसला आहे. 'शेनसारखा खेळाडू आणि व्यक्ती घडला नाही,' असे म्हणत ऑस्ट्रेलियन पंतप्रधान स्कॉट मॉरिसन यांनी वॉर्नला आदरांजली वाहिली. क्रिकेट ऑस्ट्रेलिया मंडळाने मेलबर्न क्रिकेट मैदानातील (एमसीजी) एका स्टॅण्डला वॉर्नचे नाव देणार असल्याचीही घोषणा केली.

क्रिकेट इतिहासातील सर्वोत्कृष्ट लेग-स्पिनर वॉर्नचे हृदयविकाराच्या झटक्यामुळे शुक्रवारी निधन झाले. तो ५२ वर्षांचा होता. तो इतक्या कमी वयात आपल्यातून निघून गेला यावर विश्वास ठेवणे ऑस्ट्रेलियन जनतेला आणि क्रिकेट रसिकांना अवघड जात असल्याचे मॉरिसन म्हणाले. ''शेन हा ऑस्ट्रेलियाच्या सर्वोत्तम व्यक्तिमत्त्वांपैकी एक होता. त्याच्यासारखा खेळाडू आणि व्यक्ती घडला नाही. त्याने खूप यश संपादले आणि




काही चूकाही केल्या, मात्र दोन्ही गोष्टी त्याने तितक्याच चांगल्या पद्धतीने हाताळल्या,'' असेही मॉरिसन यांनी नमूद केले.

मेलबर्न येथे जन्मलेल्या वॉर्नचे 'एमसीजी'मधील एका स्टॅण्डला नाव देणार असल्याचे व्हिक्टोरिया राज्याचे क्रीडामंत्री मार्टीन पाकुला यांनी सांगितले. ''आम्ही ग्रेट सदर्न स्टॅण्डचे एस. के. वॉर्न स्टॅण्ड असे नामकरण करणार आहोत. यासाठीची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण केली जाईल,'' असे पाकुला म्हणाले.

## रणसंग्राम रागीणींची जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

चंद्रोदय क्रीडा मंडळाच्या विद्यमाने दि. ०८ ते ११ मार्च २०२२ या कालावधीत महिला गटाच्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रणसंग्राम रागीणींचा या अंतर्गत या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रभादेवी येथील मुरारी घाग मार्गावरील स्व. दिनकर खाटपे क्रीडांगणावर होणाऱ्या या स्पर्धेत मुंबईतील १६ नामवंत संघानी आपला सहभाग नोंदविला आहे. या स्पर्धेची तयारी जोरदार सुरू असून त्याकरिता एक क्रीडांगण तयार करण्यात आले आहे. सामने सायंकाळच्या सत्रात प्रखर विद्युत झोतात खेळविण्यात येतील.




या स्पर्धेतील विजयी, उपविजयी व उपांत्य उपविजयी दोन्ही संघांना चंद्रोदय मंडळाच्या वतीने रणरागिणी चषक व रोख रकमेची पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबर अंतिम विजेत्या व उपविजेत्या संघातील सर्व खेळाडूंना आकर्षक पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू, उत्कृष्ट चढाई व पकड यांनादेखील खास पारितोषिक बहाल करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे उद्‌घाटन मंगळवारी (दि. ८) होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून अर्जुन पुरस्कार माया मेहेर, शिवछत्रपती पुरस्कार तारक राऊळ, रेखा देवकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती एका पत्रकाद्वारे मंडळाचे अध्यक्ष महेंद्र कोठेकर यांनी सर्व प्रसार माध्यमांना दिली.

### मुंबई शहरची जिल्हा अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा २२ मार्चपासून

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या वतीने २२ मार्च २०२२ पासून भारतीय क्रीडा मंदिर-वडाळा येथे जिल्हा अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेचे-(२०२१-२२) आयोजन करण्याचे ठरविले आहे.



या स्पर्धेत विशेष व्यावसायिक गट, व्यावसायिक-अ आणि ब गट, व्यावसायिक महिला, स्थानिक ब आणि क गटाचा समावेश असणार आहे. तरी ज्या संलग्न संघांना या स्पर्धेत आपला सहभाग नोंदवायचा असेल त्यांनी आपले प्रवेश अर्ज सायंकाळी ७ ते ८.३० या वेळेत सुटीचे दिवस वगळता १७ मार्च २०२२पर्यंत संघटनेच्या कार्यालयात जमा करावेत, असे एका पत्रकाद्वारे मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह विश्वास मोरे यांनी प्रसार माध्यमांना कळविले आहे.

## शोतोकान कराटे असोसिएशनच्या खेळाडूंना रायगड भूषण पुरस्कार

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग येथे युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडियाच्या चार खेळाडूंना विविध क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल रविवारी (दि. ६) रायगड जिल्ह्यातील मानाचा रायगड भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडिया ही संस्था गेल्या ३० वर्षांपासून डॉ. मंदार पनवेलकरयांच्या अध्यक्षतेखाली मार्शल आर्टस् मधील विविध क्रीडा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य पातळीवर खेळाडूंना घडवून त्यांना



योग्य ते मार्गदर्शन करत आहे. शिहान निलेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वरद केणी याने थाई बॉक्सिंग क्रीडा प्रकारात एशियन चॅम्पियनशीप स्पर्धेत सुवर्णपदक, साहिल सिणारे वूशु खेळात तर राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक, शिहान प्रशांत गांगर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली रोहित भोसले किकबॉक्सिंग खेळात आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक आणि प्रद्युम्न म्हात्रे याने आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई करत प्राविण्य मिळवल्याबद्दल त्यांना रायगड भूषण या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याबद्दल युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडियाचे अध्यक्ष रेंशी डॉ. मंदार पनवेलकर, उपाध्यक्ष शिहान रवींद्र म्हात्रे, सचिव शिहान विनीत साठ्ये यांनी खेळाडू आणि प्रशिक्षकांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## फलंदाजी अन् गोलंदाजीतील रंजक रेकॉर्ड

**दिल्ली : वृत्तसंस्था**

रणजी ट्रॉफीचा पहिला सामना ८७ वर्षापूर्वी १९३४-३५ साली खेळला होता. रणजी ट्रॉफी साधारण ८७ वर्षापूर्वी सुरू झाली. काल अखेर पाच हजार सामने खेळले गेले आहेत. रणजी ट्रॉफीचा हा प्रवास प्रत्येक खेळाडूला आणि चाहत्यांसाठी खास अनुभव देणारा आहे. रणजी ट्रॉफीच्या इतिहासात ५००० पेक्षा जास्त सामने खेळले आहेत. रणजी ट्रॉफी ही भारतातील सर्वोत्तम क्रिकेट चॅम्पीयनशीप आहे. भारतातील राज्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघामध्ये क्रिकेटचे सामने खेळवले जातात. यामध्ये एकूण ३८ संघ सामने खेळतात.

रणजी सामन्यात सर्वात जास्त धावा करण्याचा विक्रम वसीम जाफर यांच्या नावे आहे. त्याने देशांतर्गत क्रिकेटमधील प्रतिष्ठित स्पर्धेत १२ हजार ३८ धावा केल्या आहेत. हा एक विक्रमच आहे. सर्वाधिक १५५ सामने, सर्वाधिक ४० शतके, एकाच वर्षात ७ शतके करण्याचा पराक्रम अशी अनेक विक्रम त्याच्या नावे आहेत. रणजी ट्रॉफी स्पर्धेत मुंबई संघाचा दबदबा राहिला आहे. मुंबईच्या संघाने सर्वांत जास्त वेळा म्हणजे तब्बल ४१ वेळा रणजी ट्रॉफीचा किताब जिंकला आहे. मुंबई संघाने शेवटचा किताब २०१५-१६ या वर्षी जिंकला होता. रणजी सामन्यात सर्वात जास्त विकेट घेण्याचा विक्रम राजेंद्र गोयल यांच्या नावे आहे. १९५८ पासून १९८५ पर्यंत ६४० विकेट घेण्याचा विक्रम आहे.





**पनवेल : संजय दिनकर भोपी यांना प्रथम स्मृतीदिनानिमित्त रविवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आदरांजली वाहिली. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, उपमहापौर सीताताई पाटील, सभापती अ‍ॅड. वृषाली वाघमारे, नगरसेवक मनोहर म्हात्रे, नगरसेविका सुशिला घरत, राजश्री वावेकर, मोतीलाल कोळी, भिमराव पोहार, अभिषेक भोपी, हर्षवर्धन पाटील आदी उपस्थित होते. सर्वांनी स्व. संजय भोपी यांना आदरांजली वाहिली.**





**नवीन पनवेल : तुकाराम बाबु नाईक यांच्या दुसऱ्या पुण्यस्मरण दिनानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आदरांजली वाहिली. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, सभापती अ‍ॅड. वृषाली वाघमारे, नगरसेविका सुशिला घरत, भाजप महिला मोर्चा शहर अध्यक्ष वर्षा नाईक, रवी नाईक आदी उपस्थित होते. सर्वांनी स्व. तुकाराम नाईक यांना आदरांजली वाहिली.**




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com